मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : ११६ ■ शनिवार, ०३ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# पनवेल महानगरपालिकेत भाजप महायुतीचा षटकार

## सहा उमेदवार बिनविरोध; पनवेलमध्ये जल्लोष; विरोधकांना मोठा दणका

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्दर्शनाखाली आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिका निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत भाजप महायुतीचे सहा उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत, त्या अनुषंगाने या निवडणुकीत भाजप महायुतीने विजयाचा षटकार मारला आहे.





यामध्ये विजयाचा पहिला विजयश्रीचा मान प्रभाग १८ मधील नितीन जयराम पाटील यांनी मिळवता होता. त्यानंतर आज उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी पाच विरोधी उमेदवारांनी आपले अर्जाची माघार घेतली. त्या अनुषंगाने प्रभाग १८ मधून ममता प्रितम म्हात्रे, प्रभाग १९ मधून दर्शना भगवान भोईर, रुचिता गुरुनाथ लोंढे, तर प्रभाग २० मधून अजय तुकाराम बहिरा, प्रियांका तेजस कांडपिळे यांनी बिनविरोध विजय मिळवला. या सर्व विजयी शिलेदारांचे निवडणूक प्रभारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, कार्यसम्राट आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, गणेश कडू, राजेंद्र पाटील, महिला मोर्चाच्या माजी तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी 'भारतीय जनता पार्टीचा विजय असो', 'एकच वादा प्रशांतदादा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. गुलाल उधळत, फटाक्यांची आतषबाजी आणि ढोल-ताशांच्या गजरात कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे विजयाचा जल्लोष साजरा केला. पनवेलच्या विकासासाठी नागरिकांनी भाजप महायुतीवर दाखवलेला हा विश्वास अधिक जबाबदारीने पेलत पनवेल शहराचा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार यावेळी महायुतीच्या नेत्यांनी व्यक्त केला. या बिनविरोध निवडीमुळे भाजप महायुतीमध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण पसरले असून विरोधकांना मात्र मोठा हादरा बसला आहे.

# ममता प्रितम म्हात्रे बिनविरोध नगरसेवक म्हणून विजयी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** भाजप नेते प्रितम म्हात्रे यांच्या पत्नी ममता प्रितम म्हात्रे या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक 18 मधून बिनविरोध निवडून आल्या आहेत. प्रतिस्पर्धी विरोधी पक्षाच्या उमेदवाराने अर्ज मागे घेतल्याने ममता प्रितम म्हात्रे या बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून आल्या आहेत. त्यांच्या या बिनविरोध निवडीमुळे भाजप कार्यकर्ते नागरिकांनी जल्लोष केला.



भाजपा नेते प्रितम म्हात्रे यांचा दांडगा जनसंपर्क आहे. तसेच ते नेहमी इतरांच्या सुखदुःखात सामील होत असतात. विरोधी पक्ष नेते असताना त्यांनी पनवेल परिसरातील अनेक विकास कामे मार्गी लावली. 2025- 26 च्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांच्या पत्नी ममता प्रितम म्हात्रे यांनी उमेदवारी अर्ज भरला. त्यांच्या विरोधात शिवसेनेच्या सेजल खडकबाण यांनी 2 जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे ममता प्रितम म्हात्रे या बिनविरोध नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. त्यांच्या निवडीमुळे असंख्य मतदार, पक्षाचे कार्यकर्ते, भाजप नेते यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# जनता विद्या मंदिर प्रशालेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे बक्षीस वितरण उत्साहात संपन्न...!

**दैनिक युवक आधार**

**लातूर प्रतिनिधी/मोहम्मद पिंजारी :** मुरुड येथील जनता विद्या मंदिर प्रशालेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे एकत्रित बक्षीस वितरण व समारोप उत्साहात संपन्न झाला.. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुरल एज्युकेशन सोसायटीचे सचिव ॲड.श्री विजय पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागाचे लातूर पोलीस उपअधीक्षक श्री मारुतीराव मुपडे हे होते.. तर मंचावर संस्थेचे सहसचिव श्री विवेक पांगळ,कार्यकारणी सदस्या श्रीमती सुवर्णा पांगळ, श्री अनिल माने, श्री नितीन माने, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री अमर मोरे, मुख्याध्यापक श्री डी. व्ही. जाधव, उपप्राचार्य प्रा. श्री दीपक सागावे,प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री विष्णु पुदाले, पर्यवेक्षिका श्रीमती तनुजा कोष्टी, श्रीमती सुरेखा क्षीरसागर, श्रीमती जया चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती...!




दिनांक २२ ते २७ डिसेंबर या कालावधीमध्ये ज्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात आल्या, या सर्व स्पर्धांचे प्राथमिक, माध्यमिक,उच्च माध्यमिक व शिवाजी महाविद्यालय या सर्वच विभागातील विद्यार्थ्यांचे एकत्रित बक्षीस वितरण

यापसंगी मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.. यापसंगी विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेतील जवळपास 1000 विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, पदके व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले....

यापसंगी बोलताना श्री मुपडे यांनी.. 'शाळेने केवळ शैक्षणिक गुणवत्ता वाढ न करता संस्कार निर्माण करणारी होणं अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले... विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देताना त्यांच्यामध्ये एक चांगला माणूस म्हणून देखील जाणीव निर्माण करून देणं आवश्यक असल्याचे त्यांनी यापसंगी बोलताना सांगितले...!'

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वच विभागातील विद्यार्थ्यांसाठी प्रशालेच्या वतीने स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते..!

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख श्री रामकृष्ण देशपांडे व प्राथमिक विभागाचे श्री श्यामसुंदर शिंदे यांनी केले..! कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग, परीक्षा विभाग या सोबतच प्रशालेतील सर्वच विभागातील सर्व शिक्षक वृंदांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती..!




# राज्यातील ६३ टक्के लाभार्थ्यांकडे अद्याप आयुष्मान कार्ड नाही

## कासवगतीने धावणाऱ्या आरोग्य विभागाने गती वाढवावी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, या उद्देशाने आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना राबविण्यात येत आहे. मात्र या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीत आरोग्य विभागाची गती अत्यंत संथ असल्याचे चित्र समोर आले आहे.




राज्यातील तब्बल ६३ टक्के पात्र लाभार्थ्यांना अद्याप आयुष्मान कार्ड मिळालेले नाही, ही बाब चिंतेची ठरत आहे. योजनेअंतर्गत राज्यात ९ कोटी ३० लाख आयुष्मान कार्ड वाटपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. मात्र आजघडीला केवळ ३ कोटी ४४ लाख कार्डचीच निर्मिती पूर्ण झाली असून उर्वरित नागरिक कार्ड पासून वंचित आहेत. कार्ड नसल्यामुळे अनेक गरजू रुग्णांना मोफत उपचारांचा लाभ मिळताना अडचण येत आहे.

विशेषतः ग्रामीण भाग, शहरी झोपडपट्ट्या, स्थलांतरित कामगार, असंघटित क्षेत्रातील मजूर यांच्यापर्यंत आयुष्मान कार्ड पोहोचण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे. कागदोपत्री योजना प्रभावी असली तरी प्रत्यक्षात लाभार्थ्यांना कार्ड मिळण्यात होणारा विलंब ही मोठी अडचण ठरत आहे.

दरम्यान, नवीन वर्षात ८० ते ९० टक्के आयुष्मान कार्ड वाटप पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने ठेवले असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र आतापर्यंतच्या कासवगतीच्या कामकाजामुळे हे उद्दिष्ट प्रत्यक्षात साध्य होईल का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. आरोग्य सेवा ही ऐच्छिक नसून मूलभूत गरज आहे. त्यामुळे आयुष्मान कार्ड वाटप मोहिमेला वेग देऊन प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत योजना पोहोचवणे ही आरोग्य विभागाची जबाबदारी आहे. नवीन वर्षात तरी आयुष्मान कार्डच्या कासवगतीने धावणाऱ्या प्रक्रियेला खऱ्या अर्थाने गती मिळावी, अशी अपेक्षा राज्यातील नागरिक व्यक्त करत आहेत.

# दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर मंत्रालयीन सभा संपन्न : सचिव तुकाराम मुंढे यांचे तात्काळ तोडण्याचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर/उरण प्रतिनिधी :** दि.३१डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना मुंबई ३२ ची सभा दिव्यांग कल्याण मंत्रालय मुंबई या ठिकाणी मा. तुकारामजी मुंडे साहेब सचिव दिव्यांग कल्याण मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली .या बैठकीला मा.राज्याध्यक्ष साईनाथजी पवार, मा.राज्य कोषाध्यक्ष विलासजी भोतमांगे ,राज्य उपाध्यक्ष मा. अशोकजी आठवले , जिल्हा अध्यक्ष तथा राज्य उपाध्यक्ष मा.संजय बरडे अकोला,नंदुरबार जिल्हाध्यक्ष आरती बाविस्कर, धाराशिव जिल्हाध्यक्ष महादेव शिंदे, बीड जिल्हाध्यक्ष अजिनाथ हाडोळे तसेच सदस्य गणेश अत्तरकर, सुभाष भिसे सुभाष सोनटक्के,म्हाडाचे सदस्य इ. पदाधिकारी सभेला उपस्थित होते. सभेमध्ये दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाविषयी सखोल चर्चा झाली धोरणात्मक निर्णय घेतले जातील आणि प्रश्न तात्काळ निकाली काढण्यात येतील.असे आश्वासन मा.तुकारामजी मुंडे साहेब सचिव दिव्यांग कल्याण यांनी संघटनेला दिले.

सभेमध्ये संघटनेचे वतीने मांडण्यात आलेले दिव्यांग कर्मचाऱ्यांचे प्रश्न खालील प्रमाणे:-

१) महाराष्ट्रातील सर्व विभागांमध्ये दिव्यांग पदोन्नतीचा अनुशेष ४%टक्के प्रमाणे २०१६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने पदाची परिगणना करून तात्काळ भरण्यात यावा .

2) दिव्यांग कर्मचाऱ्यांना मिळत असलेला वाहन भत्ता ग्रामीण साठी २७००/-आणि शहरी विभागासाठी ५४००/असा भेद नष्ट करून सरसकट सर्वांना ५४००/-दिव्यांग भत्ता लागू करण्यात यावा .


3) दिव्यांग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान उपकरणे पुरवण्यासाठी निधीची तरतूद वेतन आणि भत्ते या हेडखाली करण्यात यावी. तसेच १ लाख रुपये अनुदान हे अपुरे पडते त्यामुळे सदर अनुदानात ५लाख रुपयांपर्यंत वाढ करण्यात यावी.

४) जिल्हास्तरावरील तक्रार निवारण समित्यांची सभा नियमित घेण्यात यावी .

५)दिव्यांगांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी सर्व जिल्हाधिकारी आणि सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र देऊन सभा घेण्याचे निर्देश देण्यात यावे .

६)संशयित आणि शंकास्पद दिव्यांग कर्मचारी यांची तपासणी करतांना कोणावरही अन्याय होणार नाही. याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात यावे .

७)दिव्यांग अधिनियम २०१६ मधिल तरतुदी आणि हक्क यांची प्रसिद्धी आणि प्रचार व्हावा यासाठी राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात यावी सर्व



अधिकारी यांना उपस्थित ठेऊन आपण स्वतः उपस्थित राहून मार्गदर्शन करावे ही मागणी मान्य केली.

८) मुंबईमध्ये मंत्रालयात ग्रामीण भागांतून अनेक दिव्यांग बांधव येतात त्यांना हक्काची जागा असावी यासाठी मंत्रालय परिसरात दिव्यांग भवनाची निर्मिती करण्यात यावी .

९ )जिल्हा स्तरीय पदोन्नती समितीमध्ये दिव्यांग संघटनेचा प्रतिनिधी घेण्यात यावा.

१०) टीईटी संदर्भात दिव्यांग शिक्षकांना किमान 35 टक्के गुण आणि पाच प्रयत्न विशेष बाब म्हणून लागू करावे.

११) दिव्यांग /कर्मचारी यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय दिव्यांग पुरस्कार देण्यात येतात त्याची अंमलबजावणी करावी.

१२) अत्यंत महत्त्वाची बाब ग्रामविकास विभागाचे शासननिर्णय असल्याने जिल्हा परिषद कर्मचारी यांना बदली व समायोजन मध्ये सुट मिळते,त्याच धर्तीवर सामान्य प्रशासन विभागाचा शासननिर्णय काढून जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे बदली आणि समायोजनातून सूट मिळावी. ही आग्रही मागणी करण्यात आली.

१३) मंत्रालयीन सर्व विभागातील दिव्यांग कर्मचारी आणि अधिकारी यांची आरोग्य तपासणी करून, सर्व जिल्हाधिकारी व सर्व मुख्य कार्यकारी यांना सुद्धा तात्काळ निर्देश देण्यात यावेत.

अशाप्रकारे अभ्यासपूर्ण मागण्या संघटनेद्वारे सभेमध्ये मांडण्यात आल्या .अतिशय सकारात्मक रित्या मा. मुंडे साहेबांनी प्रतिसाद देऊन तात्काळ समस्या मार्गी लावण्यात येतील असे संघटनेला आश्वासन दिले.याप्रसंगी संघटनेच्या वतीने तयार केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन मा. तुकारामजी मुंडे साहेबांच्या हस्ते करण्यात आले.साहेबांनी सभा घेतल्याबद्दल महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना राज्य अध्यक्ष श्री. साईनाथ पवार साहेब यांनी आभार मानले.

## जलजीवन मिशनच्या कामात शेतकऱ्याची अधिकृत पाईपलाईन फोडून लाखोंचे नुकसान

### प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**गुगुळ पिंपरी /ता. सेनगाव, हिंगोली) :** गुगुळ पिंपरी येथील शेतकरी श्री. शिवराम धोत्रे यांच्या शेतातील शासकीय परवाना घेऊन टाकलेली सिंचन पाईपलाईन जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या कामात फोडण्यात आल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. संबंधित ठेकेदाराने पाईपलाईन तुटल्यास तात्काळ जोडून देण्याचे आश्वासन दिले होते; मात्र वारंवार विनंत्या करूनही आजतागायत पाईपलाईन जोडून देण्यात आलेली नाही.श्री. धोत्रे यांनी सन 2024 मध्ये वाशिम पाटबंधारे विभागाकडून उपसा सिंचनाचा शासकीय परवाना (जा.क्र. 1742) घेऊन तसेच आवश्यक नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून गायरान गट क्रमांक 546 मधून अधिकृत पाईपलाईन टाकलेली होती. ऑगस्ट 2024 मध्ये जलजीवन मिशनच्या विहीर खोदकामादरम्यान ही पाईपलाईन फोडण्यात आली.

या प्रकारामुळे गट क्रमांक 505 मधील 04 हेक्टर शेती दोन वर्षांपासून सिंचनाविना पडीत राहिली असून अंदाजे 3 ते 4 लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच सिंचन परवान्यासाठी भरलेली ₹6000/- रक्कमही वाया गेली आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, पाईपलाईन पूर्ववत जोडून द्यावी व झालेल्या नुकसानीची योग्य ती नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी श्री. धोत्रे यांनी प्रशासनाकडे केली आहे.8 दिवसांच्या आत कार्यवाही न झाल्यास, ग्रामपंचायत कार्यालय, गुगुळ पिंपरी समोर कुटुंबासह आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## नर्सिंग हा केवळ व्यवसाय नाही, तर ती 'मानवतेची सेवा' : प्रा. अस्मा मुजावर

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** विज्ञानाच्या विद्यार्थ्यांनी बारावीनंतर केवळ पारंपरिक कोर्सेसच्या मागे न लागता 'नर्सिंग' क्षेत्राकडे करिअरचा एक उत्तम पर्याय म्हणून पाहावे. नर्सिंग हा केवळ पैसे कमावण्याचा व्यवसाय नसून, ती वैज्ञानिक ज्ञानाला मानवी संवेदनशीलतेची जोड देणारी एक पवित्र 'सेवा' आहे, असे प्रतिपादन नॅशनल नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या प्रा. अस्मा मुजावर यांनी केले.

स्थानिक नॅशनल उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित 'बारावीनंतर करिअरची दिशा' या विषयावरील मार्गदर्शन कार्यक्रमात त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य अब्दुल राजीक अहमद होते.

प्रा. मुजावर पुढे म्हणाल्या की, गेल्या काही वर्षांत आरोग्य क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे नर्सिंग क्षेत्रात रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण झाल्या आहेत. आज रुग्णालये, दवाखाने आणि सामुदायिक आरोग्य केंद्रांमध्ये कुशल परिचारिकांची मोठी गरज आहे. बी.एस्सी. नर्सिंग हा चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम केवळ नोकरी देत नाही, तर विद्यार्थ्यांना शरीरशास्त्र,



औषधनिर्माणशास्त्र आणि मानसिक आरोग्य यांसारख्या विषयांत तज्ज्ञ बनवतो. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. शेख शमीम मॅडम आणि शगुफ्ता तहेसीन यांनी प्राचार्या अस्मा मुजावर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी नर्सिंग प्रवेश प्रक्रिया आणि या क्षेत्रातील भविष्यातील संधींबाबत विचारलेल्या प्रश्नांना प्रा. मुजावर यांनी सविस्तर उत्तरे दिली.

या यशस्वी कार्यक्रमासाठी नॅशनल हायस्कूलचे शिक्षक अख्तर सर, इब्राहीम सर, शमीम मॅडम, शगुफ्ता मॅडम, मुदस्सीर सर, शेख जाकीर सर, राशिद सर आणि आदिल सर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन विद्यालयाच्या वतीने करण्यात आले. मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि शिक्षक या मार्गदर्शनाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित होते.

## आष्टी येथील अनिता कदम यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/ मारुती सत्रे :** आष्टी शहरातील अनिता दिलिप कदम वय ५७ यांचे बुधवार दि.३१ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले त्यांच्या पार्थिवावर बुधवारी रात्री ११.३० वाजता आष्टी शहरातील शेकापुर रोडवरील खंडोबा मंदिर परिसरातील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले,एक मुलगी,सुन



असा परिवार आहे. दिलीप कदम यांच्या त्या पत्नी तर हरि कदम,पवन कदम यांच्या मातोश्री होत्या.

## नववर्षाच्या पहिल्याच दिवशी 'मिशन उभारी'तर्फे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना धान्य किट वाटप

**दैनिक युवक आधार**

**मनोज उर्फ एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ) :** नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी सामाजिक बांधिलकीचा सशक्त संदेश देत महागाव नगरीचे माजी उपनगराध्यक्ष उदय भाऊ नरवाडे यांच्या पुढाकारातून मिशन उभारी अंतर्गत यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना धान्य किटचे वाटप करण्यात आले.

या मानवतावादी उपक्रमावेळी विकास मीना, जिल्हाधिकारी यवतमाळ,तसेच अभय मस्के, तहसीलदार महागाव हे,उपस्थित होते.उदय भाऊ नरवाडे यांनी नववर्षाच्या मंगलदिनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात देत समाजाप्रती आपली संवेदनशील व जबाबदार भूमिका अधोरेखित केली. आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना




तात्काळ आधार देणारा या लोकाभिमुख कार्याचे हा उपक्रम असून, त्यांच्या जिल्हाभरातून कौतुक होत आहे.सामाजिक दायित्वाची जाणीव ठेवत यापूर्वीही अनेकदा गरजूंसाठी पुढाकार घेणाऱ्या उदय नरवाडे यांनी मानवी मूल्यांना प्राधान्य दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पुन्हा एकदा महागाव नगराध्यक्षपदी निवडीची संधी मिळावी,अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.नववर्षाच्या पहिल्याच दिवशी गरिबांच्या डोळ्यांत आशेचा प्रकाश निर्माण करणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## नालासोपाऱ्यात ११ जानेवारी रोजी कोकणवासीय पंचरंगी डफ शाहीरी गीतांचा कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रमोद तरळ) :** अनादी सिध्द शक्ति-तुरा समाज शाहीर संघ राजापूर (रजि.) मुंबई विभाग यांच्यावतीने शाहीर,कवी, वस्ताद गुरुवर्य स्वर्गीय गोविंद बाळू कार्शिंगकर शक्तिवाले (भानुदास घराणे) यांच्या स्मरणार्थ रविवार दि.११ जानेवारी २०२६ रोजी स. ११ वा. साई छाया विद्यामंदिर, जिजाईनगर, मोरे गाव, रिक्षा स्टँड, नालासोपारा पूर्व येथे कोकणवासीय पंचरंगी डफ शाहीरी गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे या कार्यक्रमात श्री सत्यवान गोविंद कार्शिंगकर - शक्तिवाले शाहीर (मु.उपळे कार्शिंगेवाडी,ता.राजापूर),श्री उमेश लक्ष्मण वाजे - शक्तिवाले शाहीर (मु.दोनिवडे,गवळीवाडी, ता. राजापूर) श्री दत्ताराम राम सौंदळकर - तुरेवाले शाहीर (मु. आंगले,ता. राजापूर), श्री गणपत जानू बाईत- तुरेवाले शाहीर (मु.




तारळ चौके,ता. राजापूर), श्री मधुकर गणपत पंदेरेसह शाहीर तुषार मधुकर पंदेरे - तुरेवाले शाहीर (मु.केळवली ता. लांजा) आदी शाहीर आपली कला सादर करणार आहेत

या कार्यक्रमाला शाहीर सत्यवान गोविंद कार्शिंगकर सह शक्तिवाले शाहीर श्री चंद्रकांत अनाजी वालम - अध्यक्ष अनादी सिध्द शक्ति-तुरा समाज शाहीर संघ, राजापूर आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला रसिकांनी आवर्जून उपस्थित राहून पंचरंगी डफ शाहीरी गीतांचा आस्वाद घ्यावा असे आवाहन श्री विश्वनाथ दादू मटकर - अध्यक्ष, श्री दिनेश तुकाराम कुडकर - सचिव, श्री संतोष शंकर कुळये - खजिनदार आणि कार्यकारिणी मंडळ व सभासद यांच्या वतीने करण्यात आले आहे

## डॉ. अभिमन्यु अर्जुनराव उदगीरे यांना पी.एच.डी पदवी प्रदान

### ९ शोधनिबंध नामवंत आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित केले आहेत

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** राजस्थान आर्यन आर्ट्स, श्री मिठुलालजी कचोलिया वाणिज्य आणि श्री सत्यनारायणजी रामकृष्णजी राठी विज्ञान महाविद्यालय वाशिम येथील प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थी अभिमन्यू अर्जुनराव उदगीरे यांना संत गाडगेबाग अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याकडून प्राणीशास्त्र विषयात आचार्य (पीएच. डी) पदवी प्रदान करण्यात आली आहे. अभिमन्यु उदगीरे यांनी आजवर ९ शोधनिबंध नामवंत अंतरराष्ट्रिय जर्नल्समध्ये प्रकाशित केले आहेत.

उदगीरे यांनी राजस्थान आर्यन आर्ट्स, श्री मिठुलालजी कचोलिया वाणिज्य आणि श्री सत्यनारायणजी रामकृष्णजी राठी विज्ञान महाविद्यालय वाशिम येथील उपप्राचार्य,



विज्ञान विभागाचे प्रमुख, प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख, व पी.एच.डी मार्गदर्शक प्राध्यापक डॉ. हेमंतकुमार विठ्ठलराव वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली "Helminth Parasites in Freshwater Fishes of Washim District Maharashtra" या विषयावर संशोधन पूर्ण केले. हे संशोधन आर.ए. महाविद्यालय येथील संशोधन केंद्रात करण्यात आले. या संशोधनात Helminth parasites प्रजातीतील जिवांचा अभ्यास करण्यात आला असून, गोडया पाण्यातील माशांवर होणाऱ्या प्रादुर्भावामुळे मत्यव्यवसायामध्ये होणाऱ्या आर्थिक नुकसानीचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. या अभ्यासामुळे वाशिम जिल्ह्यातील मत्यव्यवसाय क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष लाभ होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

संशोधन काळात त्यांना संशोधन मार्गदर्शक डॉ. हेमंतकुमार विठ्ठलराव वंजारी, प्राचार्य डॉ. ओमप्रकाश झंवर (आर.ए. महाविद्यालय), संशोधन केंद्र प्रमुख डॉ.रचना पचोरी, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ.प्रदीपकुमार पाटील, प्राध्यापक डॉ. शेषराव राठोड, डॉ. सचिन तायडे, डॉ.जया सोमटकर यांचे विशेष सहकार्य लाभले. आर.ए. महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री. ठाकूरदासजी मालानी, सचिव श्री. सुधीरजी राठी, राजस्थान एड्युकेशन च्या माजी अध्यक्षा व विद्यमान सदस्य श्रीमती शिलाताई राठी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यशाबद्दल त्यांना त्यांचे वडील अर्जुनराव उदगीरे, आई संगीता उदगीरे, सहकारी मित्र विशाल खडसे, भागवत सावके, गोपाल काटेकर, यश वाकुडकर, गोपाल आदमणे, सोमेश काटेकर यांनी त्यांचे कौतुक केले.

# अजिंठ्यातील खैरुन्निसा उर्दू प्राथमिक शाळेत 'कॅन्टीन डे' उत्साहात संपन्न



**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :** अजिंठा (ता. सिल्लोड) येथील खैरुन्निसा उर्दू प्राथमिक शाळेत नुकताच 'कॅन्टीन डे' अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे शाळा परिसरात जणू एक दिवसाचा आनंद मेळावाच भरल्याचे चित्र पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि पालकांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष उजाळा मिळाला.

या निमित्ताने विद्यार्थ्यांनी शाळेच्या मैदानावर विविध खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल उभारले होते. यामध्ये पिझ्झा, बर्गर, पाणीपुरी, समोसा, भेल, इडली-डोसा, व्हेज रोल, मिसळ-पाव, चणा मसाला आणि गुलाबजाम अशा चटपटीत पदार्थांची रेलचेल होती. विद्यार्थ्यांनी केवळ पदार्थ विक्री केली नाही, तर हिशोब ठेवणे, ग्राहकांशी संवाद साधणे आणि सांघिक कामाचा अनुभव घेत व्यावहारिक ज्ञानाचे धडेही गिरवले.

कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक शेख अफसर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकवृंदाने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने केले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः स्टॉलचे व्यवस्थापन सांभाळल्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वृद्धिंगत झाल्याचे पाहायला मिळाले. पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत, असे कार्यक्रम मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

संस्थेचे अध्यक्ष इक्बाल अहमद यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे कौतुक करताना सांगितले की, "शिक्षणाचा उद्देश केवळ पुस्तकी ज्ञान देणे नसून, विद्यार्थ्यांना व्यावहारिक जीवनासाठी सक्षम बनवणे हा आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य आणि सामाजिकतेची भावना निर्माण होते."

या प्रसंगी संस्थेचे सचिव शेख जियाउलहक, संचालक शम्सुलहक, अमीर हमजा, सईद खान, शेख मोइनुलहक, माजी सरपंच सय्यद नासेर हुसैन, शेख कलीम, सय्यद मजहर अली, संजय जाधव, शेख सलीम, पठाण जाकेर, मोहम्मदी मशहुद मुगिस, फाजेद टेलर, शेख अफरोज, रिजवान कुरेशी, साबेर कुरेशी, मुख्याध्यापक शेख अफसर, जाहिर अन्सारी, गुलाम खुसरो यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री राघोबा देवाच्या साक्षीने कराडी समाजाचा दिनदर्शिका प्रकाशन सोहळा

## अनिष्ट प्रथांना तिलांजली देण्याचा निर्धार

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर/उरण प्रतिनिधी :** कराडी समाज मंडळ (महाराष्ट्र ) च्या वर्धापन दिनानिमित्त , तसेच नवीन वर्षाचे औचित्य साधून उरण कोटगावचे जागृत ग्रामदैवत श्री राघोबा देव मंदिरात समाज मंडळाच्या २०२६ सालचा नवीन दिनदर्शिका प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या सोहळाच्या निमित्ताने समाजाच्या प्रगतीसाठी नव्या विचारांची पेरणी आणि अनिष्ट रूढी, परंपरांना फाटा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्धार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात श्री राघोबा श्रीफळ वाढवून करण्यात आली.त्यानंतर मंडळाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे आणि समाज बांधवांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित वक्त्यांनी प्रभावीपणे आपले मनोगत व्यक्त केले. समाज पुढे न्यायचा असेल तर केवळ एकत्र येऊन चालणार नाही तर, काळाच्या ओघात समाजविघातक ठरणाऱ्या काही चुकीच्या पद्धती, जुनाट परंपरा मोडीत काढायला पाहिजे. त्याचप्रमाणे लग्न समारंभातील अवाजवी खर्च,शिक्षणाकडे दुर्लक्ष, समाजाला मागे खेचणाऱ्या प्रथांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रीसूत्रीचा अवलंब करणे आवश्यक आहे. तरुणांना कौशल्यावर आधारित शिक्षण, उद्योजकतेसाठी प्रोत्साहन, समाजातील आर्थिक दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे, समाज पुढे जाण्यासाठी आर्थिक बाबींचा समावेश करणे गरजेचे आहे या विषयावर चर्चा करण्यात आली.मान्यवरांच्या



शुभहस्ते कराडी समाज मंडळाच्या २०२६ च्या नवीन दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. या दिनदर्शिकेत सण, उत्सव, थोर पुरुषांची जयंती आणि महत्त्वाच्या माहितीचा समावेश करण्यात आला आहे .

दिनदर्शिका प्रकाशन सोहळा केवळ एक औपचारिक कार्यक्रम न राहता समाजाला अंतर्भूत करणारा आणि परिवर्तनाची दिशा देणारा ठरला. श्री राघोबा देवाच्या साक्षीने घेतलेला विकासाचा संकल्प कराडी समाजाला नक्कीच प्रगतीपथावर नेईल असा विश्वास समाज बांधवांनी व्यक्त केला. कॅलेंडरच्या तारखा तर दरवर्षी बदलतील, पण ज्या दिवशी आपल्या समाजातील प्रत्येक घराचा उंबरठा प्रगतीच्या प्रकाशाने उजळलेल , प्रत्येक तरुणाच्या हाती सन्मानाचे काम असेल त्या दिवशी खऱ्या अर्थाने आपल्या समाजाची नवी पहाट होईल हाच परिवर्तनाचा विचार काळजात जपून ठेवू या. सदरच्या सुंदर कार्यक्रमासाठी श्री महादेव बंडा (कराडी समाज अध्यक्ष) विलास पाटील ( सेक्रेटरी)सूरदास गोवारी (पनवेल तालुका अध्यक्ष) रमेश ढबुशे ( चौल विभाग अध्यक्ष) रमण कासकर (उरण तालुका अध्यक्ष)दत्ता शेळके (सह सेक्रेटरी) पांडुरंग झावरे ( उपाध्यक्ष चौल विभाग) मेघश्याम झावरे, शांताराम भगत, शिवदास पाटील (सचीव) शंकर भोईर ( सह सेक्रेटरी) मुकूंद पाटील गुरुजी, हरिश्चंद्र पाटील, प्रल्हाद कासकर(सह खजिनदार) नामदेव पाटील, गणेश पाटील (बांधकाम सभापती) शंकर कासूकर(शिक्षण सभिपती) शिवचंद् भोपी के.जी पाटील,धाया कामोटकर ,सदानंद पाटील, श्याम भोईर ,अरविंद पाटील, मनीष पाटील (कोटगाव उपाध्यक्ष ) जितेंद्र भोईर, मूर्ती शिंदे ,दिलीप पाटील, कुंदन भोईर ,सुषमा पाटील, सुनील पाटील, दीपक पाटील व पंच कमिटी कोटगाव यांची उपस्थिती होती.

# मुल्हेर येथे महिला बचत गटांसाठी ग्राहक संरक्षण प्रबोधन कार्यक्रम उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी /राहुल कुलकर्णी :** ग्राहक पंचायत महाराष्ट्र, नाशिक जिल्ह्याच्या वतीने बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथे महिला बचत गटांसाठी "ग्राहक संरक्षण आणि जनजागृती" या विषयावर विशेष प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास परिसरातील महिला बचत गटांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली.




प्रास्ताविक सतीश शुक्ल यांनी केले. यावेळी मार्गदर्शन करताना पदाधिकाऱ्यांनी दैनंदिन जीवनात खरेदी करताना महिलांनी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन केले. वस्तूंची शुद्धता, वजन-मापे, कमाल किरकोळ विक्री किंमत (MRP) तसेच उत्पादनाचा अंतिम दिनांक (Expiry Date) तपासूनच खरेदी करावी, असे आवर्जून सांगण्यात आले.

ग्राहक प्रबोधन सत्रात नाशिक जिल्हा संघटक राजेंद्र बागुल यांनी शेतकरी वर्गाने खते, बी-बियाणे व शेती उपयोगी साहित्य खरेदी करताना होणाऱ्या फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, तसेच योग्य पावती (बिल) घेण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. सहसंघटक सतीश शुक्ल यांनी ग्राहक पंचायतीचा इतिहास आणि ग्राहक संरक्षण कायद्याची सविस्तर माहिती दिली.

यावेळी बागलाण तालुका संघटक विलासराव सोनवणे व प्रकाश रत्नांनी यांनीही मार्गदर्शन केले. महिलांनी ग्राहक संरक्षण कायद्याबाबत विचारलेल्या प्रश्नांना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

कार्यक्रमास परिसरातील महिला बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तसेच मुल्हेर ग्रामपंचायतीचे सरपंच निंबा भानसे, ग्रामविस्तार अधिकारी जाधव साहेब, ग्रामपंचायत सदस्य व ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे पदाधिकारी उपस्थित होते.शेवटी सतीश शुक्ल यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# पाथरी तालुका वकील संघाची निवड अध्यक्षपदी कुलकर्णी तर सचिवपदी कांबळे

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** तालुका वकील संघाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली अध्यक्षपदी अँड टि बी कुलकर्णी उपाध्यक्ष ॲड ज्ञानेश्वर मगर यांची एकमताने निवड करण्यात आली वकील संघाच्या कार्यकारिणी निवडीसाठी गुरूवारी दि १रोजी मावळते अध्यक्ष अँड अशोक गालफाडे यांच्या अध्यक्षतेखाली वकील संघाची बैठक झाली यात अध्यक्ष पदी अँड टि बी कुलकर्णी उपाध्यक्ष अँड ज्ञानेश्वर मगर सचिव अँड आर एम कांबळे सहसचिव नाईक कोषाध्यक्ष अँड बी एस नन्नवरे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे यावेळी अँड कालीदासराव चौधरी अँड खर्डेकर अँड बालासाहेब तळेकर अँड जे के अन्सारी अँड बी पी चव्हाण अँड अशोक पोटभरे अँड यु एस डोंगरे अँड आर ए महिपाल अँड डि बी निशिगंध अँड नेताजी मोरे अँड दाभाडे अँड शाम साळवे अँड बी व्हि हिवाळे अँड श्रीपाद कोंत अँड एम पी कुलकर्णी अँड हरकळ अँड अतुल चौधरी अँड एस एन आरबाड अँड राजेश गिराम अँड काळदाते अँड मंगेश कुलकर्णी अँड आर टी सिताफळे अँड एन जी अन्सारी अँड किरण नाईक अँड चिंलवंत अँड गात अँड साकेब सिद्दीकी यांच्यासह आदिची उपस्थिती होती

# महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघामार्फत पत्रकार दिनाचे आयोजन !

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी/गुरुनाथ तिरपणकर :** मराठी पत्रकारितेमध्ये 'आद्य पत्रकार' म्हणून ओळखले जाणारे "दर्पण" वृत्तपत्राचे संस्थापक, संपादक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची ६ जानेवारीला जयंती असते. आणि हाच दिवस "पत्रकार दिन" म्हणून ओळखला जातो. या दिवशी सर्व पत्रकार, माध्यम प्रतिनिधी व पत्रकारांच्या संस्था तसेच संघटना हा "पत्रकार दिन" सगळीकडे मोठया उत्साहात साजरा करतात.

याच दिवसाचे औचित्य साधून, मुंबई व महाराष्ट्रात नावाजलेला महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघमार्फत देखील एका छान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ६ जानेवारी २०२५ रोजी बी. आर. दंडवते सभागृह, महाराष्ट्र हायस्कूल शेजारी, ना.म.जोशी मार्ग, करी रोड(प), मुंबई. याठिकाणी सायंकाळी ६ ते १० या वेळेत हा कार्यक्रम साजरा होणार आहे. सध्या संघाची २५ व्या वर्षाकडे (रौप्य महोत्सवी )वाटचाल सुरु आहे. त्यामुळे या निमित्ताने सदर कार्यक्रमात, पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य केलेल्या महाराष्ट्रातील अनुभवी, ज्येष्ठ व श्रेष्ठ अशा २५ संपादक मंडळींचा यथोचित सत्कार सोहळा करण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह- सन्मानपत्र- शाल व श्रीफळ देऊन, त्यांना "सन्मानित" केले जाणार आहे. तसेच पाच दिवाळी अंकाचा "विशेष सन्मान" करण्यात येणार आहे. सन्मान चिन्ह- सन्मानपत्र- शाल व श्रीफळ देऊन त्यांचाही "सन्मानित" केले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी "ज्येष्ठ पत्रकार व दैनिक सागर चे संपादक सन्मा. डॉ. सुकृत खांडेकर, दैनिक लोकसत्ता चे संपादक ज्येष्ठ पत्रकार गिरीश कुबेर, जेष्ठ समाजसेविक सौ. जयश्री ताई संगितराव (विश्वस्त- महिला विकास मंडळ, कुलाबा, मुंबई) यांच्यासह अन्य मान्यवरांची मुख्य उपस्थिती लाभणार आहे.तेव्हा महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाच्या या कार्यक्रमासाठी सर्व पदाधिकारी यांच्यासह सभासद तसेच विविध माध्यम क्षेत्रातील पत्रकार आणि आपण आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्त्री शिक्षणाच्या जनक क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले

क्रांती ज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले (३ जानेवारी, इ.स.१८३१ - १० मार्च, इ.स. १८९७) या एक भारतीय समाज सुधारक, शिक्षण तज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून त्यांना ओळखले जाते. आपले पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाईंना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. सावित्रीबाई आणि त्यांचे पती हे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. या दोघांनी १ जानेवारी,१८४८ रोजी पुणे येथील भिडेवाड्यात मुलींची शाळा सुरू केली. ती जागा ज्योतीराव फुले यांच्या हिंदू ब्राह्मण मित्राने शाळेसाठी दिली होती. ही शाळा देशात स्थापन झालेल्या भारतीय माणसाच्या सुरुवातीच्या शाळांपैकी एक होती. ती शाळा ६ महिने चालली..मुलींच्या अनेक शाळा ब्रिटिशांनी सुरू केल्या. अहिल्यानगर येथील मिस.फेरार यांच्या शाळेतून त्यांनी प्रेरणा घेतली.१८४७ मध्ये, विद्यार्थी साहित्यिक आणि वैज्ञानिक दैवज्ञ् ब्राह्मण (सुवर्णकार) समाजाच्या मुंबईचे शिल्पकार नाना शंकर शेठ यांनी मुंबईच्या गिरगाव परिसरात मुलींसाठी कमलाबाई हायस्कूल सुरू केले. ती अजून चालू आहे. पेरी चरण सरकार यांनी १८४७ मध्ये बारासात या बंगाली शहरात कालीकृष्ण गर्ल्स हायस्कूल नावाची मुलींसाठी शाळा सुरू केली. पारशी समुदाय मुंबईने १८४७ मध्ये मुलींसाठी एक शाळा देखील स्थापन केली होती. तसेच १८४७ ला हिंदू मराठे राजे भोसले यांनी सातारा येथे मुलींची शाळा चालू केली. मात्र सावित्रीबाई ह्या भारतातील मुलींच्या ब्रिटिश कालीन शिक्षिका आहेत. त्या इंग्लिश शिक्षणाच्या पुरस्कर्त्या होत्या. महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. त्या एक लेखिका देखील होत्या. त्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले आहे.इ.स.१८९७मध्ये प्लेगची साथ आल्यावर त्यांनी लागण झालेल्या लोकांसाठी काम केले. या प्रक्रियेत सावित्रीबाई फुले यांना देखील प्लेगची लागण झाली. १० मार्च, १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला. ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. १० मार्च १९९८ रोजी भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. २०१५ मध्ये, पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे करण्यात आले. ३ जानेवारी, २०१७ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जन्मदिना निमित्त कोटी कोटी विनम्र अभिवादन...!!!



**सौ मिरा राजेंद्र सानप**
**इंद्रप्रस्थ कॉलनी बीड.**

# सिल्लोडच्या शिवारात निसर्गाचा दुर्मिळ ठेवा; 'मुरमाटी बाभूळ' ठरतेय आरोग्यदायी!

## ७५ वर्षांचा जुना वृक्ष; यावर वाढणारी बुरशी मानवासाठी 'सुपरफूड

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :** निसर्गाच्या अफाट खजिन्यात अनेक दुर्मिळ गोष्टी दडलेल्या असतात, याचा प्रत्यय सिल्लोड शहरात आला आहे. भारतात बाभळीच्या ३४ प्रजाती आढळतात, मात्र त्यातील अत्यंत दुर्मिळ आणि जवळपास नामशेष झालेली 'मुरमाटी बाभूळ' (Acacia Eburnia) सिल्लोड-खोडकाई रस्त्यावरील लक्ष्मीकांत इंगे यांच्या शेतात आढळून आली आहे. विशेष म्हणजे, या झाडावर वाढणारी एक विशिष्ट बुरशी मानवासाठी औषधी आणि शक्तिवर्धक असून, या वृक्षाचे संवर्धन करण्यासाठी आता वनस्पती अभ्यासकांनी पुढाकार घेतला आहे.

सिल्लोड येथील वनस्पती अभ्यासक डॉ. संतोष पाटील हे परिसरातील जैवविविधतेचे निरीक्षण करत असताना त्यांना या झाडाच्या पिवळसर फुलांनी आणि पानांच्या वेगळ्या रचनेने आकर्षित केले. सखोल अभ्यासानंतर हे झाड साधी बाभूळ नसून दुर्मिळ 'मुरमाटी बाभूळ' असल्याचे स्पष्ट झाले. सुमारे ७५ वर्षांपासून हे झाड शेताच्या बांधावर दिमाखात उभे असून, डॉ. पाटील यांनी तातडीने या वृक्षाची विस्तृत माहिती देऊन सिल्लोड नगर परिषदेच्या 'लोक जैवविविधता नोंद वही'त (PBR) याची नोंद घेण्याची विनंती पत्राद्वारे केली आहे.

वेध विज्ञानाचा: झाडावरील 'मुरमुटी' ठरणार मानवी आरोग्यासाठी वरदान

औषधी बुरशी: या बाभळीवर 'रावेनालिया इस्कुलेंटा' या रस्ट प्रकारच्या बुरशीचा प्रादुर्भाव होतो. यामुळे झाडाच्या पेशींची अनियंत्रित वाढ होऊन 'मुरमाट्या' (मुरमुटी) तयार होतात.

उच्च पोषकतत्वे: यात पॉली फेनॉल ऑक्सिडेज, इंडोल-3-असेटीक ॲसिड आणि अमिनो ॲसिड (उच्च दर्जाचे प्रोटीन्स) मुबलक प्रमाणात असतात.

शक्तिवर्धक भाजी: शिजवल्यानंतर याची भाजी चवीला उत्कृष्ट लागते आणि ती शरीरासाठी कमालीची शक्तिवर्धक मानली जाते.--

**पर्यावरणाचे 'लाईफलाईन'**


हे झाड पर्यावरणासाठी अमूल्य आहे. पॉईंटेड सिलेट ब्ल्यू, ब्राईट बबूल ब्ल्यू, डल बबूल ब्ल्यू आणि अनोमेलस नवाब यांसारख्या ६ प्रजातींच्या फुलपाखरांचे संपूर्ण जीवनचक्र या एकाच वृक्षावर अवलंबून असते. तसेच अत्यंत देखणा असणारा 'सोनपाखरू' (Jewel Bug) यावरच अधिवास करतो. या झाडाच्या पिवळ्या फुलांकडे मधमाशा आणि कीटक मोठ्या प्रमाणावर आकर्षित होतात.

**संवर्धनाचा संकल्प**

या वृक्षाला दमट हवामान आणि जलस्त्रोतांच्या काठची जमीन पोषक ठरते. ही बुरशी हवेद्वारे पसरते आणि खार व माकडे ती मोठ्या आवडीने खातात. सध्या ही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याने, डॉ. पाटील यांनी या झाडाच्या शेंगांपासून नवीन रोपे तयार करून वृक्षारोपणाचा संकल्प सोडला आहे.







"ही प्रजाती जवळपास नामशेष झाली आहे. जैवविविधता कायद्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या दप्तरी याची नोंद होणे अनिवार्य आहे. आम्ही रोपनिर्मितीद्वारे या दुर्मिळ वृक्षाचा प्रसार करणार आहोत, जेणेकरून भविष्यात ही नैसर्गिक संपदा टिकून राहील. यावर माझा रिसर्च पेपरही लवकरच प्रसिद्ध होईल."

**— डॉ. संतोष पाटील (वनस्पती अभ्यासक, अभिनव प्रतिष्ठान, सिल्लोड**

# विजय मोठा आणि निश्चित असला तरी कोणत्याही परिस्थितीत गाफील राहू नका - प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल :** हि फक्त निवडणूक नाही तर सर्वसामान्यांचा विश्वास आहे. विजय मोठा आणि निश्चित असला तरी कोणत्याही परिस्थितीत गाफील राहू नका, असे आवाहन भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी आज(दि. ०२) येथे केले. पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे कार्यकर्ता संवाद मेळावा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पुढे बोलताना म्हंटले कि, पनवेलमधील जनतेने भाजपवर नेहमीच विश्वास टाकला आहे. हा विश्वास कायम राखण्यासाठी प्रत्येक कार्यकर्ता शेवटच्या घटकापर्यंत प्रामाणिकपणे काम करत आहे. संघटनात्मक ताकद, विकासकामांचा लेखाजोखा आणि जनतेशी थेट संवाद याच्या जोरावर पनवेलमध्ये भाजप महायुती मोठा विजय मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी प्रचारात शिस्त, संयम आणि सकारात्मक भूमिका ठेवण्याचे निर्देश दिले. जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासाचा संदेश घराघरात पोहोचवण्याचे आवाहनही त्यांनी केले. देशाच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी तर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस गतीने काम करत आहेत. त्यामुळे गतीमान सरकारला जनतेचा पाठिंबा आहे. मतरदारांचा कौल भाजप महायुतीला आहे. पंतप्रधान मोदीजी आणि देवेंद्रजी दिवसातून सोळा सोळा तास काम करत आहेत. भाजपचा कार्यकर्ता म्हणून आपणही काम करत राहिले पाहिजे. बुथची सर्वात मोठी ताकद असलेला आपला पक्ष आहे. २० प्रभागात होणारी हि निवडणूक आहे. त्यामुळे बूथ रचनेतून काम करा, प्रत्येक मतदार नागरिकापर्यंत पोहचा, मोदीजी, देवेंद्रजी यांनी आणि भाजप महायुतीने केलेल्या कार्याची माहिती संवादातून द्या, असा मौलिक सल्लाही त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लोकाभिमुख कार्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर दोन दोन तास बोलू शकतात ते नेहमी आपल्या भाषणात मोदीजी देवेंद्रजींच्या कार्याचा गौरव सांगतात आणि त्यातून ते कार्यकर्त्यांना चार्ज करत असतात. जगातील विद्यापीठे या ठिकाणी येऊन एज्युकेशन हब होणार आहेत आणि याचा फायदा येथील प्रत्येक नागरिकाला होणार आहे. अन्नसुरक्षापासून अनेक योजना




यशस्वीपणे कार्यरत आहेत त्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे, त्यामुळे ते द्रष्टानेता आहेत. असे सांगून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी 'तुमची आमची भाजप सर्वांची' हा गजर पुन्हा दुमदुमणार आहे, असा विश्वासही व्यक्त केला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात म्हंटले कि, भाजपच्या कार्यकर्त्याला यशाच्या दिशेने नेण्यासाठी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची निवड मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मागील निवडणूक त्यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लढून ७८ पैकी ५१ जागा जिंकून वर्चस्व सिद्ध केले. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी निवडणूक कशी लढायची याची शिकवण दिली. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, अमितजी शहा, देवेंद्रजींनी रवींद्रजींनी राज्याला ताकद दिली आहे. त्यामुळे नुकताच झालेल्या नगरपरिषद नगरपालिकेच्या निवडणुकीत सर्वात जास्त नगराध्यक्ष, उमेदवार विजयी झाले. देवेंद्रजी सर्वसामान्यांचे नेतृत्व असून रविंद्रजींच्या नेतृत्वाखाली संघटन मोठ्या प्रमाणात होत आहे. राज्याच्या विकासाचा दृष्टिकोनातून काम असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शहरात ग्रामीण भागात विकासाचा झपाटा निर्माण झाला आहे. पनवेल महापालिका निर्माणासाठी शेकापने विरोध केला पण आपण सर्वांनी निर्धार केला आणि महापालिका होऊन महापालिकेच्या प्रत्येक भागात विकास सुरु झाला. २०१७ साली जनतेने कौल दिला तो विश्वास सार्थ ठरवून विकासकामे झाली, केलेल्या कामाचा संदेश घेऊन मतदारांपुढे जाणार असून पनवेल महापालिकेचा विकासाचा पुढील टप्पा अर्थात व्हिजनसुद्धा तयार आहे, असेही त्यांनी नमूद केले. अनेक कार्यकर्त्यांना उमेदवारी देऊ शकलो नाही पण ज्यांना उमेदवारी मिळाली नाही पण पक्षाचा सन्मान राखला. एबी फॉर्मसाठी धावणारे नाही तर पक्षाने जबाबदारी दिलेले कार्यकर्ते होते, त्यामुळे त्या सर्वांचे मी आभार व्यक्त करत असून त्यांचा विश्वास महत्वाचा ठरला आहे, असेही त्यांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले. तसेच महायुतीमधील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय या मित्रपक्षांचे एकदिलाने सहकार्य मिळाले असल्याचे सांगून त्याबद्दलही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आभार मानले.

**भाऊ आणि उत्कृष्ट सहकारी म्हणून परेश ठाकूर यांचा अभिमान**

निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच माझे बंधू परेश ठाकूर यांनी आपण ही निवडणूक लढवणार नाही, अशी स्पष्ट भूमिका जाहीर केली होती आणि ती त्यांनी प्रत्यक्षात अंमलातही आणली. कार्यकर्ता प्रथम ही भावना त्यांनी कृतीतून दाखवून दिली. निवडणूक जाहीर झाल्यानंतर हजारो कार्यकर्त्यांनी त्यांना निवडणूक लढवण्याचा आग्रह केला; मात्र त्यांनी तो नम्रपणे नाकारत कार्यकर्त्यांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले. निःस्वार्थ आणि तत्त्वनिष्ठ भूमिकेमुळे भाऊ आणि उत्कृष्ट सहकारी म्हणून मला परेश ठाकूर यांचा मनापासून अभिमान आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

मेळाव्याचे प्रास्ताविक भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले.यावेळी निवडणुकीत बिनविरोध झालेले नितीन पाटील यांच्या प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सत्कार झाला.

या मेळाव्याला कोकण म्हाडाचे सभापती बाळासाहेब पाटील, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, उपाध्यक्ष गणेश कडू, प्रल्हाद केणी, राजेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, मंडल अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रांतीय राज्यपालांची लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाला भेट देऊन माजी अध्यक्षांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव**

**वाडी नागपूर :** रविवार, २८ डिसेंबर रोजी नुकत्याच झालेल्या कार्यक्रमांत प्रांतीय राज्यपालांची लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाला भेट दिली आणि लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाच्या माजी अध्यक्षांचा सन्मान कार्यक्रम सदर नागपूर येथील हॉटेल कोणार्क द आर्क (हॉटेल एलबी) येथे आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुण्यांमध्ये प्रांतीय राज्यपाल एम. जे. एफ.भरत बालगड, द्वितीय उपप्रांतीय राज्यपाल एम. जे. एफ. डॉ. अरुण चतुर्वेदी आणि झोन अध्यक्ष एम.जे.




एफ.डॉ.सतीश राणे यांचा समावेश होता. अध्यक्ष डॉ. भावना भलमे यांनी अध्यक्षांचा ठराव आणि क्लबची प्रस्तावना सादर केली. सचिव डॉ. नकुल मरकम यांनी उपस्थितांना सचिवांचे भाषण सादर केले. कोषाध्यक्ष ला. सोनल त्रिवेदी यांनी क्लबचे लेखाजोखा सादर केले. प्रांतीय राज्यपाल एम.जे.एफ. भरत बालगड यांनी क्लबच्या कार्याचे कौतुक केले आणि मार्गदर्शन केले. द्वितीय उपप्रांतीय राज्यपाल एम.जे. एफ. डॉ.अरुण चतुर्वेदी यांनी बैठकीचे मार्गदर्शन केले. झोन चेअरपरसन एम.जे.एफ. डॉ. सतीश राणे यांनी बैठकीचे मार्गदर्शन केले.

डिसेंबर हा ग्रँड पास्ट प्रेसिडेंट फेलिसिटेशन मंथ म्हणून ओळखला जातो. या प्रसंगी लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाच्या सर्व २१ माजी अध्यक्षांचा शाल आणि नारळ देऊन सत्कार करण्यात आला. संचालन डॉ. संजय थेटेरे यांनी केले तर आभार सचिव डॉ. नकुल मरकाम यांनी मानले. अशी माहिती लायन्स क्लब नागपूर आयुर्वेदाचे प्रशासक डॉ. मंगेश भलमे यांनी दिली.

## श्री मतोबा महाराज यात्रोत्सवानिमित्त आरोग्य विभाग सज्ज; आरोग्य विभागाची सर्वंकष तयारी

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री मतोबा महाराजांच्या येत्या ३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या वार्षिक यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्राथमिक आरोग्य केंद्र, नैताळे यांच्यावतीने सर्वंकष आरोग्य व्यवस्था सज्ज करण्यात आली आहे. यात्रेदरम्यान मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असल्याने संभाव्य आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. पुरुषोत्तम चारुडे यांनी दिली.

यात्रा काळात आजारपण, अपघात, अचानक प्रकृती बिघडणे तसेच जलजन्य व कीटकजन्य आजारांचे व्यवस्थापन करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका व गटप्रवर्तकांची विशेष बैठक घेऊन त्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. यंत्रणेची तयारी तपासण्यासाठी मॉक ड्रिल्सही घेण्यात आल्या. जिल्हास्तरावरून मोठ्या प्रमाणावर औषधसाठ्याची मागणी करण्यात आली असून बहुतांश औषधे उपलब्ध झाली आहेत. ए.आर.व्ही व ए.एस. व्ही इंजेक्शनसह आपत्कालीन उपचारासाठी आवश्यक सर्व औषधे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध आहेत.

यात्रा कालावधीत वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी २४ तास कार्यरत राहतील, अशा पद्धतीने ड्युटी नियोजन करण्यात आले आहे. तसेच १०८ व १०२ ॲम्बुलन्स सेवा २४ तास उपलब्ध ठेवण्यात येणार आहे. गावातील पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची तपासणी करून पाणी शुद्धीकरण, टीसीएल साठा तपासणी तसेच ग्रामपंचायतीला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. अन्नविषबाधा टाळण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाशी समन्वय साधण्यात आला असून यात्रेच्या काळात फूड स्टॉल्स व हॉटेल चालकांना स्वच्छता व अन्नसुरक्षा नियम पाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो, टायफॉईड यांसारख्या आजारांपासून बचावासाठी जनजागृती व स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, यात्रेच्या काळात साथरोग नियंत्रण कक्ष २४ तास सुरू ठेवण्यात आला असून डॉ. सुरज टेकाळे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हास्तरीय पर्यवेक्षक वाणी नाना यांच्या मार्गदर्शनाखाली हा कक्ष कार्यरत राहणार आहे. भाविकांनी स्वच्छ पाणी व अन्न सेवन करावे तसेच कोणतीही आरोग्य समस्या उद्भवल्यास तात्काळ आरोग्य कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

## ज्येष्ठ नागरिक संघ पनवेलच्या साप्ताहिक सभेत वाहतूक नियमनाबाबत मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** ज्येष्ठ नागरिक संघ, पनवेल यांच्या साप्ताहिक सभेच्या निमित्ताने पनवेल शहर वाहतूक शाखेच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने तसेच पो हवा येळे व पो हवालदार मुलाणी अंमलदार उपस्थित राहून ज्येष्ठ नागरिकांना वाहतूक नियमनासंदर्भातील विविध अडचणींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



यावेळी ज्येष्ठ नागरिकांना रस्ता ओलांडताना घ्यावयाची काळजी, पादचारी मार्गाचा योग्य वापर, सिग्नलचे नियम, तसेच वाहनचालकांकडून होणाऱ्या वाहतूक नियमभंगामुळे उद्भवणाऱ्या अडचणी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांना पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांनी समर्पक उत्तरे देत आवश्यक सूचना केल्या. पनवेल शहर वाहतूक शाखेच्या या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती होऊन त्यांच्या सुरक्षिततेसाठी सकारात्मक वातावरण निर्माण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सणसर गावातील शाळा दवाखाना व विकाकामे यांची पाहणी

### तीन वर्ग खोल्या व प्राथमिक दवाखान्याचे काम करण्याच्या सूचना

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यात सणसर येथे सुरू असलेल्या विविध विकास कामांना आज दि. (२) रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद गजानन पाटील यांनी भेटी दिल्या.यावेळी शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले सणसर गावातील सुरू असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मॉडेल स्कूलचे व अंगणवाडीची काम तात्काळ सुरू करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सूचना दिल्या तसेच शाळेचा परिसर,स्वच्छता याबाबत सूचना दिल्या व सुरू असलेल्या कामाची माहिती सागर भोईटे पार्थ निंबाळकर अभय निंबाळकर यांनी दिली घेतली.सणसर येथील मॉडेल स्कूल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी भेट दिली.सणसर या ठिकाणी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र तसेच नवीन बांधकाम करण्यासाठी योग्य सूचना देऊन




भेट दिली त्यावेळी कर्करोग निदान शिबिराचे उदघाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले तालुक्यामधील मार्च महिन्याच्या आत सर्व चालू कामाचे काम पूर्ण करण्यात यावे इंदापूर तालुक्यामधील मार्च महिन्याच्या आत सुरू असलेल्या कामाचे काम पूर्ण करण्यात यावे अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या यावेळी इंदापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी सचिन खुडे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुरेखा पोळ पंचायत समितीचे बांधकाम विभागाचे शाखा अभियंता आनंदा शेंडे गटशिक्षणाधिकारी निलेश गवळी सणसरचे सरपंच यशवंत नरूटे,ग्रामसेवक सचिन पवार डॉ पौळ डॉ पाटील माजी सरपंच पार्थ निंबाळकर सागर भोईटे बजरंग रायते पुष्कराज निंबाळकर रोहित पाटील मुख्याध्यापक गवळी गुरुजी आदी शिक्षक व आरोग्य विभागातील कर्मचारी ग्रामस्थ उपस्थित होते.

## नागपूर विद्युत लोकपालपदी श्री. भालचंद्र खंडाईत यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** विद्युत क्षेत्रात सुमारे ३५ वर्षांचा अनुभव असणारे तसेच महावितरणचे सेवानिवृत्त संचालक श्री. भालचंद्र खंडाईत यांनी विदर्भ व मराठवाडा कार्यक्षेत्र असलेल्या नागपूर विद्युत लोकपाल पदाचा नुकताच कार्यभार स्वीकारला. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यांची नियुक्ती केली आहे.



श्री. भालचंद्र खंडाईत हे भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यांतील सानगडी येथील रहिवासी असून त्यांनी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात दि. २३ ऑगस्ट १९८९ रोजी चंद्रपूर परिमंडलातील नवरगाव वितरण केंद्रात कनिष्ठ अभियंता म्हणून विद्युत क्षेत्रातील कार्यकाळास सुरुवात केली. त्यानंतर पदोन्नतीद्वारे महावितरणचे कार्यकारी अभियंता म्हणून श्री. खंडाईत यांनी नागपूर जिल्ह्यात, अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता म्हणून मुंबई मुख्यालयात काम केले आहे. महावितरणचे नागपूर प्रादेशिक संचालक म्हणून त्यांनी प्रामुख्याने गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागासह विदर्भामध्ये नवीन वीजजोडणी व विद्युतीकरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे केली. तसेच महावितरणचे संचालक (प्रकल्प) म्हणून श्री. भालचंद्र खंडाईत यांनी राज्यभरात राज्य व केंद्र शासनाच्या विविध प्रकल्पांना व योजनांना गती दिली.

महावितरणचे संचालक म्हणून सेवानिवृत्त झाल्यानंतर श्री. भालचंद्र खंडाईत यांची विद्युत नियामक आयोगाने नागपूर विद्युत लोकपालपदी नियुक्ती केली होती. या पदाचा कार्यकाळ संपल्यानंतर श्री. खंडाईत यांची विद्युत लोकपाल म्हणून आयोगाकडून पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# भीमा कोरेगांव शौर्य दिनानिमित्त बुद्ध भुमी प्रशिक्षण केंद्र मुदखेड येथे समता सैनिक दलाचा भव्य महारॅली कार्यक्रम संपन्न झाला

**दैनिक युवक आधार**

**नांदेड जिल्हा प्रतिनिधी/प्रकाश गवारे :** सकाळी ठिक ११:०० वा. रॅलीला सुरुवात झाली.सर्व प्रथम महात्मा फुले चौक यांच्या नाम फलकाला पुष्पहार अर्पण करण्यात आला आहे व समता सैनिक दल यांनी सलामी दिली. त्यानंतर ही रॅली शिवाजी महाराज यांच्या पुतळयाच्या नियोजीत ठिकाणी आल्यावर त्यांच्या नामफलकाला पुष्पहार अर्पण करण्यात आला आहे.व त्या ठिकाणी समता सैनिक दल यांनी सलामी दिली.व आंबेडकर पुतळयाच्या नियोजीत ठिकाणी आल्यावर त्या ठिकाणी सर्व प्रथम पंचशील धोज्याचे धोजारोहण भा.बौ.म. ता.अध्यक्ष प्रशांत निखाते व

भंतेजी शिलरत्न व भंतेजी गगन बौध्दी व तालुका पदाधिकारी समता सैनिक दल यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला त्याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नामफलकाला पुष्पहार अर्पण करण्यात आला व भिमा कोरेगांव विजय स्तंभला मानवंदना देण्यात आली आणि समता सैनिक दल यांनी सलामी दिली. त्यानंतर त्रिशरण पंचशील शिलरत्न भंतेजी यांनी उपस्थित जनसमुदाय यांना आशिर्वाद दिला व अनेक उपासकानी शुभेच्छा मनोगत व्यक्त केले.

१ जानेवारी १८१८ रोजी झालेल्या भीमा कोरेगांव ऐतिहासिक लढ्याच्या शौर्य दिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल मुदखेड तालुका यांच्या वतीने बुद्ध भुमी प्रशिक्षण केंद्र मुदखेड येथे भव्य अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात भीमा कोरेगांवच्या लढाईतील महापराक्रमी ५०० शूरवीरांना व त्यांच्या अतुलनीय शौर्याला त्रिवार वंदन करण्यात आले. यावेळी विजयस्तंभास मानवंदना देत शौर्य परंपरेला अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात समता सैनिक दलाचे प्रशिक्षण सत्रही घेण्यात आले. या प्रशिक्षणासाठी सुनील चौदंते व देवराव



चौदंते (माजी सैनिक) यांनी मार्गदर्शन केले. शिस्त, परेड, संघटनात्मक बांधणी व सामाजिक जबाबदारी यावर त्यांनी सैनिकांना प्रशिक्षण दिले.

या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभा मुदखेड तालुक्यातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच मुदखेड परीसरातील प्रामुख्याने उपासक -उपाशिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमात "शौर्य दिवस चिरायू होवो" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

समता सैनिक दल : शतकपूर्तीच्या दिशेने वाटचाल

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलास २० मार्च २०२७ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या अनुषंगाने समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भिमराव य. आंबेडकर यांच्या आदेशानुसार

"गाव तिथे शाखा, घर तिथे सैनिक" या संकल्पनेनुसार महाराष्ट्रात दोन लाख सैनिक घडविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

यासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून भरतीपूर्व सैनिक प्रशिक्षण शिबिरे घेतली जात असून, प्रत्येक सकाळी ६ ते ७ व संध्याकाळी ८ ते१० या वेळेत परेड व सराव आयोजित करण्यात आले आहेत.

समता सैनिक दल का आवश्यक आहे?

समता सैनिक दल ही केवळ संघटना नसून सामाजिक न्याय, समानता व अत्याचारित घटकांच्या संरक्षणासाठी उभी असलेली चळवळ आहे. महाडच्या सत्याग्रहापासून ते आजपर्यंत समाजरक्षण व चळवळीला ताकद देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या दलाने केले आहे.

प्रमुख उद्दिष्टे :

सामाजिक समानतेसाठी लढा

गावागावातील लोकांचे रक्षण

सामाजिक सुधारणा घडवून आणणे

अत्याचारित व दुर्बळ घटकांसाठी आवाज उठवणे

सामाजिक न्याय व समतेची स्थापना

सामाजिक जाणिवा वाढवणे

आवाहन

सर्व जिल्हे, तालुके व गावांतील १८ वर्षे व त्यापेक्षा जास्त वयाच्या इच्छुक नागरिकांनी "घर तिथे सैनिक" या आवाहनानुसार समता सैनिक दलात सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

संस्थापक : प. पू. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

राष्ट्रीय संरक्षक : महाउपासिका मीराताई य. आंबेडकर

राष्ट्रीय अध्यक्ष : डॉ. भिमराव य. आंबेडकर

"संविधान के सन्मान में, समता सैनिक दल मैदान में!"

नंतर या रॅलीच्या समारोप सरनतय गाथेने करण्यात आला.या रॅलीला

पुलिस बंदोबस्त देण्यात आला व विशेषता पोलिस निरीक्षक चव्हाण साहेब, पोलिस उपनिरीक्षक कांबळे साहेब, व सर्व पोलीस कर्मचारी यांच्या बंदोबस्तात ही महारॅली शांततेत पार पडली.

# नागपुरात नॅशनल लेव्हल ट्रायबल 'कोया पुंगार' व 'कोया मुराल' फॅशन शोचे भव्य आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/राहुल मडावी नागपूर :** नागपूर शहरात अनुस्वी फाउंडेशन, आर. के. रेला प्रोडक्शन व टाइम्स एनजीओ यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल लेव्हल ट्रायबल कोया पुंगार व कोया म्युरल फॅशन शो चे भव्य आयोजन दि. २७ व २८ डिसेंबर रोजी वसंतराव नाईक सभागृह (वनामती), सिव्हिल लाईन्स येथे यशस्वीरीत्या पार पडले.

या कार्यक्रमाचे आयोजक प्राजक्ता आदित्य ताराम व कनाद मेश्राम होते. कार्यक्रमाच्या शो डायरेक्टर व फॅशन कोरिओग्राफर म्हणून आर्चना तडसे मॅडम यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, तर ग्रूमर व मॉडेल म्हणून क्रिस्ट राज यांनी योगदान दिले.

कार्यक्रमाच्या टीममध्ये आशा तुमडाम, सुषमा इवनाते व समीर धुर्वे यांचा समावेश होता.

कार्यक्रमाला यवतमाळ येथील सामाजिक कार्यकर्त्या प्रिया तोडसाम, महेंद्र उईके, प्रशांत कुमरे, धर्मराज



भालावी, तसेच जंगल कामगार अधिकारी (भंडारा) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यासोबतच ५० हून अधिक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या फॅशन शोच्या ज्युरी पॅनलमध्ये नागपूरचे प्रसिद्ध व अनुभवी ॲडव्होकेट व सामाजिक कार्यकर्ते मुकेश पेंदाम सर, पीएच.डी. डॉ. रायन घोडाम सर, प्रसिद्ध गायक सुबोध वेलादे व प्राजक्ता बोबडे यांचा समावेश होता.

कार्यक्रमात नागपूरचे प्रसिद्ध गोंडी गायक अजय मसराम, महेश कोकोडे, मोहित आत्राम (नागपूर), विशाल कोकोडिया (छिंदवाडा) तसेच तबला वादक ओमी उईके यांच्यासह अनेक कलाकारांनी सहभाग घेतला. गोंडी नृत्य, गोंडी संगीत आणि पारंपरिक आदिवासी वेशभूषेच्या सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली.

**स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे:**

Miss Koya Pungar

विजेती: शिल्पा अटाला

प्रथम उपविजेती: भाविका धुर्वे

द्वितीय उपविजेती: दिव्या मेश्राम

Mr. Koya Mural

विजेता: पवन मारस्कोले

प्रथम उपविजेता: समीर धुर्वे

द्वितीय उपविजेता: श्रेयांश सीडाम

Mrs. Koya Pungar

विजेती: स्नेहल केराम

प्रथम उपविजेती: प्रणाली कोवे

द्वितीय उपविजेती: पूजा पंधारे

कपल राऊंड विजेते

ऋषभ ठाकूर व नीतू ठाकूर (मध्यप्रदेश)

किड्स कॅटेगरी

विजेती: अर्कजा उईके (परासिया, छिंदवाडा)

प्रथम उपविजेती: श्राव्या आलम

द्वितीय उपविजेती: युक्ती मार्सकोले

डान्स स्पर्धा

विजेती: स्नेहल केराम (यवतमाळ)

सिंगिंग स्पर्धा

विजेता: ॲबी – ट्रायबल रॅपर (छिंदवाडा)

हा संपूर्ण कार्यक्रम हाऊसफुल ठरला व अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशासाठी आयोजकांनी सर्व कलाकार, सहभागी स्पर्धक, टीम सदस्य, मान्यवर अतिथी व सर्व प्रायोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.

# यशवंतराव चव्हाण कला क्रीडा महोत्सव इंटरनॅशनल स्कूल राक्षेवाडी चाकण येथे पार पडलेल्या कला क्रीडा स्पर्धेमध्ये चिखलगाव मुकेवाडी जिल्हा परिषद शाळेचा प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**

**डॉ. देवेंद्र ओव्हाळ खेड पुणे :** वार सोमवार दिनांक २९/१२/२०२५ रोजी पुणे जिल्हा परिषद आयोजित सन २०२५/२६ या शैक्षणिक सत्रातील यशवंतराव चव्हाण कला क्रीडा महोत्सव विद्या व्हॅली इंटरनॅशनल स्कूल राक्षेवाडी (चाकण) येथे उत्साहात पार पडला. क्रीडा महोत्सवात धावणे , उंच उडी, लांब उडी, गोळा फेक, थाळी फेक, लंगडी, खो खो, कबड्डी यासह इतर स्पर्धा घेण्यात आल्या. यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुकेवाडी या शाळेतील विद्यार्थिनींनी इयत्ता ५ते ७ या मोठ्या गटात लंगडी या खेळात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. आपल्या चपळ खेळाने या शाळेतील विद्यार्थिनींनी



उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कुमारी वेदा निलेश गोपाळे या विद्यार्थिनीचा खेळ पाहून खेड तालुक्याचे माननीय गटशिक्षण अधिकारी श्री. अमोलजी जंगले यांनी तिचे विशेष कौतुक केले. विजेत्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुकेवाडी या शाळेतील विद्यार्थिनींना शिक्षणविस्तार अधिकारी श्रीमती. अनिता शिंदे यांच्या हस्ते चषक, मेडल व सर्टिफिकेट देऊन गौरवण्यात आले. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. रामचंद्र केदारी, क्रीडा शिक्षक श्री. सोमनाथ मुऱ्हे तसेच शिक्षक श्री. दिलीप चौधरी यांच्यासह श्री. अशोक कुसळे उपस्थित होते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुकेवाडी शाळेतील विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वंचीत बहुजन आघाडीच्या प्रियंका विश्वकर्मा यांचे पसायदान ग्रृप तर्फे सत्कार

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ प्रमुख :** आगामी नगर परिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय हालचालींना वेग आला असून, नागरिकांमध्ये विकासाच्या मुद्द्यावर ठाम एकमत तयार होताना दिसत आहे. "यंदा मत विकासाला !" हे घोषवाक्य लोकांमध्ये चांगलेच रूजले असून, बदल आणि प्रगतीच्या आकांक्षा अधोरेखित करत आहे. वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट), शिवसेना (एकनाथ शिंदे गट), शेतकरी संघटना आणि जय हिंद क्रीडा प्रसारक मंडळ या आघाड्यांनी एकत्र येत सौ.प्रा.प्रियंकाताई निलेश विश्वकर्मा यांना नगराध्यक्ष पदासाठी अधिकृत उमेदवार म्हणून पुढे केले आहे. या व्यापक आघाडीमुळे शहरात उत्सुकता व चर्चांना वेग आला आहे. प्रियंकाताई विश्वकर्मा यांनी शहरातील नागरिकांशी थेट संवाद साधण्याला प्राधान्य देत घराघरांत जाऊन जनसंपर्क मोहिमेला अधिक गती दिली आहे. महिलांपासून ते तरुणांपर्यंत विविध घटकांकडून त्यांना मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, विकासाभिमुख नेतृत्वाची मागणी अधिक स्पष्ट दिसून येत आहे. आघाडीतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी चांदूर रेल्वेच्या सर्वांगीण विकासासाठी एकदिलाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. "या निवडणुकीत बदल आणि विकासाचा विजय निश्चित," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला असून,




जनतेचाही कल त्याच दिशेने असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. समाजकारणाची आवड पती नीलेश विश्वकर्मा यांच्यासोबत खांद्याला खांदा लाऊन सक्रिय राजकारणातही सहभाग, याशिवाय ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या संचालिका. पंडित मदनमोहन तिवारी पी.बी.बी.एस्सी. महाविद्यालयाच्या संचालिका याशिवाय गृहिणी म्हणून संपूर्ण जबाबदारी त्या यशस्वीरीत्या पार पाडत आहेत.

कधीकाळी चांदूर रेल्वे शहरातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी अमरावती किंवा दूरच्या शहरांचा आधार घ्यावा लागत असे. विशेषतः मुलींना बाहेर जाऊन शिक्षण घेणे अवघड ठरत होते.पण,आज चित्र पूर्णपणे बदलले आहे - कारण योग्य दृष्टी, शहरावरील आत्मीयता आणि सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे चांदूर रेल्वेमध्ये व्यावसायिक शिक्षणाची क्रांती घडली आहे. नीलेश विश्वकर्मा यांच्या पुढाकारामुळे शहरात थेट पाच व्यावसायिक महाविद्यालयांची स्थापना झाली.यातील सर्वात लौकिक उपलब्धी म्हणजे ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग या महाविद्यालयामुळे शहरात प्रथमच बी. एस्सी. नर्सिंग आणि जी.एन. एम. वर्गाची सुरुवात झाली आहे.या कोर्सेसमुळे मुलींना दूर न जाता शहरातच उच्च दर्जाचे व्यावसायिक शिक्षण मिळत आहे. रोजगाराच्या संधी वाढत आहेत आणि विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक मजबूत होत आहे.या महाविद्यालयांमुळे शहराची शैक्षणिक गुणवत्ता उंचावतच नाही, तर बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे शहरातील लोकसंख्येत वाढ आणि व्यवसायांना नवी उभारी मिळत आहे. शहरातील किरकोळ व्यापारापासून निवास सुविधांपर्यंत संपूर्ण व्यावसायिक चलनवलनात सकारात्मक बदल दिसून येत आहे.


चांदुररेल्वे नगरपरिषद नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ प्रियंकाताई निलेशराव विश्वकर्मा या भाजप आणि काँग्रेस सारख्या राष्ट्रीयकृत बलाढ्य पक्षाच्या उमेदवारांना पराभव करून वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार म्हणून निवडुन आलेल्या आहेत. त्यांचा सत्कार वंचित घटकातील सामान्य नागरिकांच्या पसायदान गृप ने त्यांचे घरी जाऊन शाल व श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.याप्रसंगी ज्ञानेश्वर डांगरकर , सुभाष परणकर ,दिलीपराव बोबडे, विनोद डोंगरे ,रमेश घवले ,ज्योत्स्ना करवाडे ,सुरेश धानोरकर,प्रभाकर नांदुरकर आणि सतिश मानेकर उपस्थित होते. उपस्थीत मंडळीचे आभार सौ प्रियंकाताई आणि निलेशराव विश्वकर्मा यांनी व्यक्त केले.हा कार्यक्रम अत्यंत आनंदी वातावरणात पार पडला.

# मुख्य निवडणूक निरीक्षकांनी घेतली आढावा बैठक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिका निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज असून प्राप्त उमेदवारी अर्जांची छाननी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांकडून सुरू आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून मुख्य निवडणूक निरीक्षक कैलास पगारे (भाप्रसे) म्हणून यांची आणि निवडणूक निरीक्षक म्हणून मनिषा कुंभार (अप्पर जिल्हाधिकारी) यांची नेमणूक झाली आहे. निवडणूक निरीक्षकांनी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या उपस्थितीत निवडणुकविषयक सर्व नोडल अधिकाऱ्यांची बैठक महापालिका मुख्यालयात घेतली. या बैठकीत निवडणूक विषयक झालेल्या सर्व तयारीचा आढावा घेण्यात आला.

पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी निवडणूक विषयक झालेल्या सर्व कामकाजाची संक्षिप्त माहिती निरीक्षकांना दिली. यामध्ये ईव्हीएम व्यवस्थापन, शासनाच्या विविध




विभागाच्या समन्वयाने केलेले नियोजन, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि प्रशिक्षण, निवडणूक साहित्यविषयक तयारी, विविध पथके आणि नोडल अधिकाऱ्यांमार्फत केले जाणारे कामकाज याबाबत माहिती दिली. यावेळी निरीक्षकांनी निवडणूक विषयक विविध कामांची सद्यस्थिती जाणून घेऊन विविध सूचना दिल्या. निवडणूक विषयक जबाबदाऱ्या पार पाडताना केंद्रीय निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे असे सांगितले. मतदान यंत्रांच्या (ईव्हीएम) व्यवस्थापनाबाबत माहिती घेताना निरीक्षकांनी याबाबत झालेल्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, यंत्रांची सिलिंग व सुरक्षा, याबाबतचे रेकॉर्ड राखणे इत्यादी कामकाजाचा आढावा घेतला. विशेष मतदान केंद्रे स्थापन करताना आदर्श मतदान केंद, पिंक मतदान केंद्र, ग्रीन मतदान केंद्र याबाबत माहिती घेतली. दिव्यांग बांधवांसाठी मतदान केंद्रांवर केलेल्या सोईसुविधांवर चर्चा करताना सद्यस्थितीतील सोईसोबत दिव्यांग बांधवांसाठी अधिकचे तात्पुरते रॅम्प उभारले जाणार असल्याबाबत चर्चा झाली. स्वीप कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत माहिती देताना नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे जनजागृती करताना मतदान जास्तीत जास्त वाढविण्याबाबत लक्ष्य असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. मतदान केंद्रावर अत्यावश्यक व आरोग्यविषयक सुविधांबाबत आढावा यावेळी निवडणूक निरीक्षकांनी घेतला. आचारसंहितेचे कडक पालक करण्याच्या दृष्टीने खर्च, मद्य वाटप, अवैध वस्तूंची वाहतूक याबाबत स्थिर सर्वेक्षण पथके, व्हिडीओ व्हीव्हिंग पथके, भरारी पथके या विविध पथकांच्या तसेच पोलीस विभाग, परिवहन विभाग, उत्पादन शुल्क विभाग या विविध विभागांच्या समन्वयाने चालू असलेल्या कामकाजाबाबत माहिती घेतली. मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत माहिती घेताना एकूण 3625 कर्मचाऱ्यांचे झालेले प्रशिक्षण, कामकाजाचे केलेले वाटप, प्रशिक्षणाचे विविध टप्पे आणि कालावधी, तयार करण्यात आलेली एकूण 725 पथके याबाबत चर्चा झाली. मतदानासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या साहित्य व्यवस्थापनाचा आढावा घेताना सर्व साहित्यविषयक तयार पूर्ण झाली असून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार तात्काळ साहित्य पुरवले जात असल्याचे सांगितले. निवडणूक विषयक कामकाज अत्यंत शिस्तबद्ध चालू असल्याबाबत निवडणूक निरीक्षकांनी समाधान व्यक्त केले.

# विदर्भातील शेतकरी व ग्रामीणविकासासाठी VNIT सहित सामाजिक संस्थानी पुढाकार घेऊन कार्य करावे - डॉ. विजय भटकर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू संपादक/नागपूर विभाग :** VNIT नागपूरसह विविध संस्थांचा संयुक्त सहभाग युवा सक्षमीकरण, महिला सक्षमीकरण, शेतकरी कल्याण व कौशल्य विकास या क्षेत्रात कार्यरत ASPECTI Social Association यांच्या पुढाकाराने विदर्भातील ग्रामीण भागात बायोगॅस प्रकल्प वितरण व अंमलबजावणी उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (VNIT), नागपूर यांना ज्ञान भागीदार (Knowledge Partner) म्हणून सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे. हा उपक्रम संपूर्ण विदर्भात राबविण्यात येणार असून आज, अकोला जिल्ह्यातील ग्राम मुरांबा (ता. मूर्तिजापूर), अमरावती जिल्ह्यातील ग्राम रेवसा (ता. 'अमरावती) तसेच नागपूर जिल्ह्यातील ग्राम उमरी वाघ (ता.हिंगणा) या गावांमध्ये बायो गैस संयंत्र निशुल्क वितरित करण्यात आले, या माध्यमातून स्वच्छ व पर्यावरणपूरक ऊर्जा, शाश्वत ग्रामीण विकास आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येणार असे संयंत्र निर्माते अभिमन्युजी पुणे कडून सांगण्यात आले. Youth-Empower या प्रकल्पांतर्गत VNIT नागपूरकडून तांत्रिक सल्ला, नवोन्मेषी तंत्रज्ञान, अंमलबजावणी मार्गदर्शन तसेच प्रकल्पाशी संबंधित डेटाचा अभ्यास व संशोधनासाठी सातत्यपूर्ण मदत उपलब्ध होणार आहे. यामुळे शैक्षणिक संशोधन आणि ग्रामीण विकास यांचा प्रभावी संगम साधला जाणार आहे. तसेच सामाजिक संस्थेच्या कामावर व गुणवत्तेवर लक्ष्य ठेवणे हे असेल.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान VNIT नागपूरचे संचालक प्रा. डॉ.प्रेमलाल पटेल यांनी भूषविले. तसेच या सोबत नैसर्गिक शेतीच्या नियोजनात व योगिक शेती सम्बंधित कार्य करून शेतकर्यांचे उत्पन्न वाढवू शकू यावर्ती भर दिला. यासाठी ब्रह्माकुमारी सेन्टर चे मार्गदर्शन व विचारांना लक्षात घेता पुढील कार्यवाही करण्यात यावी असे सांगण्यात आले. या कार्यक्रमास पद्मभूषण डॉ. विजय भटकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. (कु.) कमल सिंग (माजी कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती




विद्यापीठ व अध्यक्ष, ASPECT India Social Association), राजयोगिनी संगीता दीदी, ब्रह्मकुमार प्रेमप्रकाश भाई, बबनराव तायवाडे (माजी व्यस्वस्थापन परिषद् सदस्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपुर), धनंजय धार्मिक (माजी आयकर आयुक्त व अध्यक्ष, समृद्ध विदर्भ -समृद्ध भारत) हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी विशेषतः दिल्ली वरुण आलेले प्रमुख पाहुने डॉ. जगवीर रावत (राष्ट्रीय संयोजक, The Bharat Innovation, Research and Development Co-operative Forum, नवी दिल्ली) गांधीजींचे विचारावर आधारित ग्रामशक्ती योजना असावी आणि त्याचा आधारावर मा.पंतप्रधान मोदीजींचे कार्य करण्याकरीता मला गुजरात तसेच महाराष्ट्र व ग्रामीण भागात काम करण्याचे आदेश दिला आहेत आणि केंद्रशाशना कडून CSR चे माध्यमातून आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वाशन दिले. या उपक्रमासाठी India International Multiversity, पुणे, VNIT नागपूर ASPECTI Social Association, गुरुदेव सेवा मंडळ, मोजरी, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय आणि समृद्ध विदर्भ समृद्ध भारत या संस्था संयुक्त सहकार्य भागीदार म्हणून सहभागी होतील या प्रसंगी समन्वयी प्रस्ताव डॉ. स्वप्निल कोकाटे सचिव Aspect India Social Association यांनी केले. या कार्यक्रमात डॉ. विजय भटकर यांच्या शुभ हस्ते समाजसेवी रामु अग्रवाल, जगदीश गुप्ता, जनाब युसूफ भाई, प्रवीणा सेठिया यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन VNIT तर्फे दिवाकर शेंडे यांनी केले, कार्यक्रमाचे संचालन सोनाली बुंदे यांनी प्रभावीपणे केले तर प्रस्ताविक डॉ.अनिल वाघ यांनी केले. याप्रसंगी पाहुनांचे स्वागत अधिवक्ता राजीव देशपांडे, स्वामी संजय कटकमवार, सविता पांडे यांनी केले. या उपक्रमामुळे विदर्भातील ग्रामीण भागात पर्यावरणपूरक ऊर्जा, तांत्रिक नवोन्मेष आणि सामाजिक विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केला.

# वाळू चोरी करून नेणारे दोन ट्रॅक्टर पकडले

## ट्रॅक्टर पकडण्यासाठी तहसीलदार एक किलोमीटर धावले

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर/प्रतिनिधी सय्यद इसा :** महाराष्ट्र शासनाकडून गोरगरीब घरकुल लाभार्थ्यासाठी प्रत्येक गावातील नाल्यातून वाळू देणे सुरू करण्यात आले असून पैनगंगा नदी पात्रातील पाच घाटांचा लिलाव झाला तोही थोड्या दिवसात सुरू होणार असतानाही वाळू तस्कर रात्रीला अंधाराचा फायदा घेऊन वाळु चोरी करण्याचा प्रयत्न करत असून वसराम नाईक तांडा शिवारातील दोन ट्रॅक्टर धारक नदीपात्रातून वाळू आणत असल्याची माहिती मिळाल्याने तहसीलदार अभिजीत जगताप यांनी वाहन जाण्यासाठी रस्ता नसल्याने चक्क एक किलोमीटर धावत जाऊन ट्रॅक्टर पकडण्याची घटना दि 2 रोजी दुपारी 1 वाजता घडली आहे



पैनगंगा नदी पात्रात जाण्यासाठी अनेक गाव खेड्यातून बैलगाडी चालण्या लायक रस्ते असून या रस्त्यावरून रात्री काही लालची वृत्तीचे ट्रॅक्टर चालक वाळू चोरी करण्याचा प्रयत्न करत आहेत अनेकांना फटका बसला तरीही अक्कल ठिकाणावर आलेली नसल्याने माहूर तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या वसराम नाईक तांडा ते पैनगंगा नदी पात्र दरम्यान रस्त्यावर विना नंबरचे दोन ट्रॅक्टर नदीपात्रातून ट्रॅक्टर मध्ये वाळू भरून आणत असल्याची माहिती मिळाली तहसीलदार अभिजित जगताप यांनी सिंदखेडचे सपोनी रमेश जाधवर यांना दूरध्वनी वरून कल्पना देऊन मंडळ अधिकारी तलाठी आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाद्वारे या रस्त्यावर अचानक पने गेले असता अनेक शेतकऱ्यांनी रस्त्यात पाणी सोडून दिले तर अरुंद रस्ता असल्याने तहसीलचे वाहन मुख्य रस्त्यावर थांबवावे लागले परंतु तहसीलदारांनी पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या ट्रॅक्टरला पकडण्यासाठी चक्क एक किलोमीटर पर्यंत धावत जाऊन दोन्ही ट्रॅक्टरला पकडून तहसील कार्यालयात आणून जमा केले

या धाडसी कारवाईत तहसीलदार अभिजीत जगताप यांचेसह सपोणी रमेश जाधवर ग्राम महसूल अधिकारी साहेबराव गावंडे मनोहर शेळके सी पी बाबर सुनील वनवे दयानंद एरडलावार अभिजीत कुडमेते महसूल सेवक सागर हिवाळे पवन पाटील विवेक नागपुरे चालक विलास शेडमाके यांचे सह कर्मचाऱ्यांनी भाग घेतला होता

# लालपरीचा प्रवास आता 'नो टेन्शन'; सिल्लोड आगारात सुरक्षिततेचा जागर!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड:** प्रवाशांच्या सेवेसाठी धावणाऱ्या एसटीचा प्रवास निर्विघ्न आणि सुरक्षित व्हावा, या उद्देशाने राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'सुरक्षितता अभियाना'चे बुधवारी सिल्लोड आगारात दिमाखात उद्घाटन करण्यात आले. १ ते ३१ जानेवारी या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या विशेष मोहिमेद्वारे प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख विजयकुमार काळवणे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बाबू मुंडे व ज्येष्ठ पत्रकार रवींद्र सोनवणे यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना आगार प्रमुख काळवणे यांनी कर्मचाऱ्यांना शिस्तीचे कडक डोस दिले. ते म्हणाले की, चालकांनी रस्त्यावर वेगाची स्पर्धा करू नये. प्रवाशांचा जीव महत्त्वाचा असून वाहकाच्या मदतीशिवाय गाडी मागे घेणे,




चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेकिंग करणे किंवा वळणावर गाफील राहणे यांमुळे अपघातांना निमंत्रण मिळते.

अनेकदा अनधिकृत थांब्यांवर बस थांबवून नंतर वेळ भरून काढण्यासाठी होणारी अतिवेगवान ड्रायव्हिंग प्रवाशांच्या जिवावर बेतू शकते, त्यामुळे नियमांचे काटेकोर पालन करणे अनिवार्य आहे. विशेषतः घाट रस्ता, अरुंद पूल आणि वळणांवर सावधगिरी बाळगत 'लो गिअर'चा वापर करण्याच्या तांत्रिक बाबीही त्यांनी समजावून सांगितल्या.

वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळणे आणि कोणत्याही अंमली पदार्थाच्या अंमलाखाली वाहन न चालवणे यावरही यावेळी विशेष भर देण्यात आला. रस्ता वापरणाऱ्या इतर नागरिकांप्रतीही आपली जबाबदारी तितकीच महत्त्वाची असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वरिष्ठ लिपिक बाबुराव पंडित यांनी केले. या कार्यक्रमास सिल्लोड आगारातील चालक-वाहक आणि यांत्रिक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुरक्षित पतंगोत्सव: पतंग पुन्हा मिळेल, पण आयुष्य नाही!

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग :** मकर संक्रांतीचा सण जवळ येत असून आकाश रंगीबेरंगी पतंगांनी भरून जाऊ लागले आहे. मात्र, पतंग उडवण्याचा हा उत्साह साजरा करताना 'वीज सुरक्षा' या विषयाकडे दुर्लक्ष करणे जीवावर बेतू शकते. दरवर्षी पतंग उडवताना विजेचा धक्का लागून होणाऱ्या अपघातांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर, वीज वितरण कंपनी आणि सामाजिक संस्थांकडून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विजेच्या तारा आणि 'नायलॉन' मांजा: एक घातक समीकरण: पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा नायलॉन किंवा चिनी मांजा हा केवळ पर्यावरणासाठीच नाही, तर मानवी जीवनासाठीही अत्यंत धोकादायक आहे. या मांजावर धातूच्या कणांचे कोटिंग असते, ज्यामुळे तो विजेचा सुवाहक बनतो. जेव्हा हा मांजा उच्च दाबाच्या वीज वाहिन्यांना (High Tension Lines) स्पर्श करतो, तेव्हा मांजा धरणाऱ्या व्यक्तीला जोरदार विजेचा धक्का बसून मृत्यू ओढवू शकतो.

विजेच्या खांबांजवळ पतंग उडवणे टाळा: शहरी




भागात विजेच्या तारांचे जाळे मोठ्या प्रमाणावर असते. अनेकदा पतंग विजेच्या तारांमध्ये अडकतो. अशा वेळी तारांमध्ये अडकलेला पतंग काढण्यासाठी लोखंडी सळई, ओले बांबू किंवा लाकडाचा वापर करू नका. यामुळे 'शॉर्ट सर्किट' होऊन मोठी दुर्घटना घडू शकते. याशिवाय, डीपी किंवा ट्रान्सफॉर्मरच्या जवळ उभे राहून पतंग उडवू नका. तेथे होणारे स्फोट किंवा स्पार्किंग गंभीर इजा पोहोचवू शकतात.

वीज पुरवठा खंडित होण्याची भीती: विजेच्या तारांमध्ये मांजा अडकल्यामुळे 'ट्रिपिंग'ची समस्या उद्भवते. यामुळे संपूर्ण परिसराचा वीज पुरवठा खंडित होऊ शकतो. तांत्रिक बिघाड दुरुस्त करताना कर्मचाऱ्यांच्या जीवालाही धोका निर्माण होतो. त्यामुळे आपला आनंद इतरांच्या अंधाराला किंवा त्रासाला कारणीभूत ठरणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे.

सुरक्षित पतंगोत्सवासाठी 'या' नियमांचे पालन करा:

मोकळ्या मैदानात किंवा सुरक्षित छतावर पतंग उडवा; वीज वाहिन्या, खांब आणि ट्रान्सफॉर्मर जवळ पतंग उडवू नका.

केवळ सुती धाग्याचा (साध्या मांजाचा) वापर करा; नायलॉन, प्लास्टिक किंवा धातू मिश्रित मांजा वापरू नका.

पतंग तारांमध्ये अडकल्यास तो तसाच सोडून द्या.; अडकलेला पतंग काढण्यासाठी ओल्या वस्तू किंवा तारांचा वापर करू नका.

लहान मुलांवर पालकांनी विशेष लक्ष ठेवावे; धावत्या रस्त्यावर किंवा विजेच्या तारांखाली पतंग पकडण्यासाठी धावू नका.

**सामाजिक आवाहन**

पतंग उडवणे हा आनंदाचा सण आहे, पण सुरक्षेशी तडजोड नको. आपल्या मुलांच्या हातात मांजा देताना तो विजेच्या संपर्कात येणार नाही, याची खात्री करा. एक सतर्क नागरिक म्हणून विजेच्या तारांवरील अडकलेले पतंग काढण्याचा धाडसी प्रयत्न कुणीही करू नये," असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# भीमा कोरेगावच्या शौर्य दिनानिमित्त शहरात केले महामानवाला अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** भीमा कोरेगावचा इतिहास म्हणजे १ जानेवारी १८१८ रोजी पुणे जिल्ह्यातील भीमा नदीकाठी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि पेशवे यांच्यात झालेली लढाई,ज्यात महार सैनिकांनी पेशव्यांच्या सैन्याचा पराभव केला,या विजयाचे प्रतीक म्हणून विजय स्तंभ उभारला असून,या विजयी स्तंभाला



डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रतिवर्षी वंदन करण्यासाठी जात असत,दलित समुदाय या दिवसाला शौर्य दिवस म्हणून साजरा करतो,ही लढाई तिसऱ्या अँग्लो-मराठा युद्धाचा भाग होती,ज्यात कमी संख्येने असलेल्या ब्रिटिश सैन्याने मराठ्यांना हरवले,आणि या विजयाने दलित समाजाला शौर्याची नवी ओळख दिली.

दि.१ जानेवारी १८१८या भीमा कोरेगावच्या शौर्य दिनानिमित सोयगाव येथील आंबेडकर नगरात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी आंबेडकर नगर येथील महिलांनी सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन वंदन केले.

यावेळी रिपब्लिकन सेनेचे तालुकाध्यक्ष अंकुश पगारे,राष्ट्रवादी पक्षाचे शहराध्यक्ष रवी भाऊ काळे,मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे,भाजपा व्यापारी आघाडी चे महासचिव प्रमोद पाटील, कर्तव्यदक्ष नगरसेवक हर्षल काळे,राहुल श्रीखंडे,अतुल पगारे,मंगेश साळवे,दयानंद पगारे,विजय वाकेकर,भीमा निकम,रमेश साळवे,तसेच आंबेडकर नगर येथील असंख्य बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते.

# नववर्षानिमित्त लासलगाव पोलिसांकडून विविध उपक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी :** नवीन वर्षाचे स्वागत करताना तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे वळू नये व आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहावे, या उद्देशाने लासलगाव पोलीस ठाण्याच्या वतीने स्तुत्य आणि अभिनव उपक्रम राबवण्यात आले.

नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर मद्यपान न करता दूध पिऊन आरोग्य निरोगी ठेवा, असा संदेश देत पोलीस ठाण्यासमोर नागरिकांना मसाला दुधाचे वाटप करण्यात आले. दरवर्षी नववर्षाच्या स्वागताच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर मद्यपान केले जाते. यामुळे अपघात, वाद - विवाद व अनुचित




प्रकार घडतात. या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना मसाला दूध वाटप करण्यात आले. या उपक्रमाला लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालयाच्या एनसीसी विद्यार्थ्यांनी मोलाची साथ दिली. यावेळी एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी कोटमगाव रोड चौफुली येथे व्यसनमुक्तीवर आधारित प्रभावी पथनाट्य सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. 'मद्यपान करून वाहन चालवू नका', 'दारू आणि गाडीचा प्रवास एकत्र नको', 'व्यसन सोडा' अशा आशयाचे प्रबोधनात्मक फलक झळकावत विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. या पथनाट्याचे नेतृत्व एनसीसी कमांडर ऑफिसर प्रमोद पवार यांनी केले.

शुक्रवार दि.२ जानेवारी रोजी, ' ड्रंक अँड ड्राईव्ह वाहतूक नियंत्रण जनजागृती अभियान २०२६' राबविण्यात आले.या उपक्रमात पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लासलगाव पोलिसांच्या या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून समाजात सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला आहे.

> “ नवीन वर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने तरुण पिढीने मद्यपानापासून दूर राहावे आणि स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. थर्टी फर्स्टच्या दिवशी मद्यपानामुळे अपघात व वादाचे प्रमाण वाढते. त्याऐवजी दूध पिऊन आरोग्यदायी पद्धतीने नवीन वर्षाचे स्वागत करावे, असा सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.
>
> भास्करराव शिंदे
> सहाय्यक पोलीस निरीक्षक

# स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रवर्तक - सावित्रीमाई

**दैनिक युवक आधार**

3 जानेवारी 1831 पासून 10 मार्च 1897 हे सावित्रीमाईंचे आयुष्यमान देशासाठी आधुनिक जगण्याचा, बनण्याचा महामंत्र देणारे ठरले. नायगावच्या सावित्री खंडोजी नेवसे पाटील या पुण्याच्या सावित्रीबाई ज्योतिराव फुले झाल्या. तेथून त्यांच्या जीवनाला आणि देशाच्या इतिहासाला वेगळे वळण मिळाले. भारतीय समाजात वेगळेच स्थित्यंतर घडून आले. साऱ्या जगाला वंद्य ठरलेल्या ज्योतीरावांच्या कार्याला सक्रिय साथ-संगत देत त्यांनी कार्यकर्तृत्व घडवले. ही साथ संगत केवळ मम म्हणणारी आणि उखाण्यात सांगणारी कधीच नव्हती.

अंतप्रेरणांसह परिवर्तनाचे मैदान त्यांनीही निवडले. परिवर्तनासाठी समाजभूमी तयार करणारी भूमिका त्यांनी घेतली. जात, वर्ण, वंश, लिंग, धर्म या आधारावर विषमता पोसणाऱ्या समाजाला छेद दिला. भेदाभेद करणाऱ्या तथाकथित संस्कृतीला आव्हान दिले. शोषितांच्या उत्थापनाचा ध्यास आणि शोषकांच्या स्वार्थी प्रवृत्ती विरुद्ध चे युद्ध ज्योतिराव गोविंदराव फुले आणि सावित्रीबाईंनी पुकारले. परिणामी आज भारतभर अनेक सावित्री विविध क्षेत्रात आपली मुद्रा उमटवीत आहेत. ज्योतिराव फुले आणि सगुनाबाई (आऊ) यांच्या संगतीने सुरू झालेला त्यांचा चैतन्यमय कार्य प्रवास आश्चर्यकारक आहे. स्त्रियांना कोणतेच स्वातंत्र्य नव्हते, त्या काळात स्त्रियांसाठी परिवर्तनाचे प्रशस्त मार्ग त्यांनी निर्माण केले.

शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्या सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक स्वातंत्र्यासाठी नवा विचार, नवे कार्य आरंभिले आणि पूर्णत्वास नेले. आपल्या आयुष्यातील पन्नास वर्षे सामाजिक युद्धात घालविली. या युद्धात झालेले आघात छळ सहन केला. मात्र आपला मार्ग आणि शेवटी आपले यश कायम ठेवले. साऱ्या कर्मठ समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाह नंतर शिक्षण घेतले आणि शिक्षक मुख्याध्यापक बनून शिक्षण दिले. केवळ चार वर्षात 18 शाळा उघडल्या आणि चालवल्या. विविध वर्गांसाठी अभ्यासक्रम तयार केले. असंख्य मुलींना प्रेरणा देऊन ज्ञान क्षेत्रात आणले. शिक्षण नव्हे ज्ञान दिले. त्यातूनच मुक्ता साळवेंचा विद्रोही अविष्कार घडला. आधुनिक भारताच्या शिक्षणाचे नायकत्व सावित्रीबाई फुले यांच्याकडे जाते. वस्ताद लहुजी साळवे, रानबा महार, धुराजी आप्पाजी चांभार, गणू शिवा महार, फातिमा शेख, उस्मान शेख हे त्यांचे शाळेतील सहकारी आधुनिक भारताच्या शिक्षणाचे शिल्पकार ठरले.

ज्योतिराव व सावित्रीबाई फुले यांनी आपल्या शाळेत शिकवलेल्या धुराजी आप्पाजी चांभार आणि रानबा महार या दलितांना भारताच्या इतिहासात शिक्षक होण्याचा मान मिळाला. मुलींना शिक्षण देण्याच्या परिश्रमपूर्वक प्रयत्नातून अभूतपूर्व समता निर्मिन्याचे प्रेरक कार्य त्यांनी केले. शोषितांचे जग बदलायचे आहे म्हणून शिक्षण अपरिहार्य होते. त्यासोबतच शूद्रांतीशूद्रांच्या छळाचा इतिहास बदलायचा होता. जातीव्यवस्था संपवायची होती. स्त्रियांचे जगणे माणसात रूपांतरित करायचे होते. शासन यंत्रणेचा जाच संपवायचा होता. सहस्रावधी मार्गांनी होणारे शोषण बंद करण्यासाठी अनेकविध विवेकनिष्ठ चळवळींची मालिकाच त्यांनी उभी केली होती. स्वतःच्या वाड्यातील विहीर पिण्याच्या पाण्यासाठी दलितांना खुली करण्याचे धाडस केले. विधवांच्या पुनर्विवाहाच्या चळवळीत सहभाग दिला.

विधवांचे केशवपण होऊ नये म्हणून नाभिकांचा संप घडवून आणण्यासाठी नेतृत्व केले. बालहत्या प्रतिबंध गृह स्थापन करून अशा स्त्रियांची बाळंतपणे स्वतः केली. आधुनिक भारतात जाती संपल्या पाहिजेत म्हणून आंतरजातीय विवाह लावण्यात त्यांनी पुढाकार घेतला. काशीबाई या विधवा ब्राह्मण स्त्रीचा मुलगा दत्तक घेतला. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेत आणि ज्योतिरावांच्या नंतर हा समाज चालवण्यात महत्त्वाचे योगदान दिले. 1875 ते 1877 या काळातील दुष्काळात दुष्काळग्रस्तांना मदत आणि अन्नछत्रे चालविली. त्यांनी ज्योतिरावांच्या भाषणांचे संपादन केले, स्वतः काव्य लेखन केले.

विविध ठिकाणी भाषणे देऊन समाजात जागृतीचा प्रयत्न केला. सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनाच्या अध्यक्षा झाल्या. शेतकरी आणि मजूर स्त्री-पुरुषांसाठी रात्रीच्या शाळा काढल्या. सत्यशोधकी पद्धतीने विवाह लावण्याची चळवळ उभारली. अशा असंख्य कार्याची यादी सावित्रीबाईंची आहे. माणूस, जमीन, नवे प्रयोग (मॅन, लँड, लॅब) यांचा अनुबंध सामाजिक परिवर्तनाच्या प्रयोगशाळेतून घडविला गेला.

1897 मध्ये पुण्यात प्लेगची साथ आली. डॉक्टर यशवंत फुले यांच्या दवाखान्यात सावित्रीबाई सेवा करीत होत्या. पांडुरंग बाबाजी गायकवाड यास प्लेग ची लागण झाली, तेव्हा सावित्रीबाईंनी त्यास उचलून दवाखान्यात आणले. त्यातच सावित्रीबाईंना प्लेगणे गाठले आणि देशाच्या परिवर्तनाच्या चळवळीतील 50 वर्षे चाललेले वादळ थांबले... आणि तेथूनच समता पर्वाची मागणी करणारे नवे वादळ सुरू झाले. आजही हे वादळ जिवंत आहे. उथापनाचा, उन्नतीचा आशय अधिक व्यापक झाला आहे. खोट्या, दांभिक मुखवट्याचे बुरखे फाडले जात आहेत. सामान्यांच्या अशा आकांक्षांचे शोषितांच्या संपन्न स्वप्नांचे जग निर्मिन्याची मागणी होत आहे.

सावित्रीबाईंच्या कार्य विचारांना व्यापक विशाल अथांग अर्थ प्राप्त झाला आहे. नवा समाज आणि नव्या समाजाची नवी संस्कृती याचा ध्यास या कार्य विचारातून प्रकट झाला. त्यासाठीच सावित्रीबाईंच्या विचारांची, कार्याची वर्तमानाला गरज आहे. त्यातून भविष्य निर्माण होईल. गर्भातच स्त्री संपविणाऱ्या या वर्तमानाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्यासाठी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे, विचाराचे सरण अटळ आहे. स्त्रियांसाठी, त्यांच्या उत्थानासाठी या स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रवर्तकाला जयंतीनिमित्त प्रणाम..



**लेखन - शिवाजी खुडे**
**प्राथमिक पदवीधर**

# कालिकादेवी महाविद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज व्याख्यानमाला

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यार्थी विकास मंडळ व कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती राजर्षी शाहू महाराज व्याख्यानमालीचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालीचे उद्घाटन पवार यांनी केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. शाहिर अनिल तिवारी गट साधन केंद्र शिरूर कासार जि. बीड हे होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे हे होते प्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. संजय तुपे विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक डॉ. रमेश घाडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.



उद्घाटन प्रसंगी बोलताना पवार म्हणाले की, त्यांनी शाहू महाराजांच्या विचारांची आजच्या काळात असलेली उपयुक्तता अधोरेखित केली. तरुण पिढीने शाहू महाराजांचे जीवनचरित्र अभ्यासून त्यातील मूल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन त्यांनी केले. महाविद्यालयात अशा प्रकारच्या वैचारिक उपक्रमांचे आयोजन होणे ही सकारात्मक बाब असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सांगितले.

प्रसंगी प्रमुख वक्ते अनिल तिवारी यांनी छत्रपती राजश्री शाहू महाराजांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्यावर सखोल विचार मांडले. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. आरक्षण धोरण, शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक समतेसाठी त्यांनी घेतलेले निर्णय आधुनिक भारतासाठी दिशादर्शक ठरल्याचे मत प्रमुख वक्त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात अध्यक्षांनी संपूर्ण व्याख्यानमालेचा आढावा घेतला. छत्रपती राजश्री शाहू महाराज हे केवळ राजे नसून सामाजिक क्रांतीचे शिल्पकार होते, असे प्रतिपादन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करावा, असा संदेश देत त्यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

या व्याख्यानाच्या पहिल्या सत्रामध्ये छत्रपती राजश्री शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान या विषयावरती डॉ.नवनाथ पवळे,डॉ. राज कोरडे, डॉ,संजय सावते, डॉ,श्याम सानप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या व्याख्यानमालेच्या दुसऱ्या सत्रात छत्रपती राजश्री शाहू महाराजांचे सामाजिक न्याय या विषयावरती डॉ. विठ्ठल गुंडे,डॉ. बी . टी पवार, डॉ. रमेश लाहोटी, डॉ. विठ्ठल जाधव यांनी आपले विचार मांडले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ.रमेश घाडगे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. रमेश लाहोटी यांनी केली उपस्थित मान्यवरांचे आभार अशोक घोळवे यांनी मानले.कालिकादेवी महाविद्यालयात छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या विचारांना समर्पित व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. सदर व्याख्यानमाला उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिजामाता बाल विद्या मंदिरात स्मृतिदिन व सत्काराचा संयुक्त सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी/शिवाजी पवार :** राजश्री छत्रपती शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. अशोकराव जोगदंड यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित तालुकास्तरीय निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिकेत अशोकराव जोगदंड यांनी सेलू नगरपालिका निवडणुकीत नगरसेवक म्हणून विजय मिळविल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ, असा संयुक्त कार्यक्रम दिनांक 31 डिसेंबर 2025 रोजी जिजामाता बाल विद्या मंदिर, सेलू येथे उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अनिकेत जोगदंड हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून नूतन विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक व ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. अशोक वानरे सर उपस्थित होते.कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष श्री. श्रीनिवास रुगले, श्री. रामेश्वर भुतडा, संस्था सचिव श्री. डी. व्ही. मुळे, सहसचिव श्री. बाबासाहेब चारठाणकर तथा मुख्याध्यापक रविंद्र पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री. रविंद्र पाठक सर यांनी केले.

प्रमुख पाहुणे श्री. अशोक वानरे सर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,

“कै. डॉ. अशोकराव जोगदंड यांनी शिक्षण क्षेत्रात घालून दिलेले मूल्याधिष्ठित कार्य आजही प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांमध्ये विचारमंथन घडवणाऱ्या अशा स्पर्धा समाजासाठी दिशादर्शक ठरतात.”कार्यक्रम अध्यक्ष डॉ. अनिकेत जोगदंड यांनी आपल्या भाषणात,“वडिलांच्या विचारांचा वारसा जपत समाजसेवा व शिक्षण हेच आपल्या कार्याचे केंद्रबिंदू राहतील. जनतेने दिलेल्या विश्वासास पात्र ठरण्याचा सातत्याने प्रयत्न करू,” असे प्रतिपादन केले.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीही संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेत भविष्यातील उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी निबंध स्पर्धेचा उद्देश, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासातील स्पर्धांचे महत्त्व व संस्थेच्या कार्याचा आढावा प्रभावी शब्दांत मांडला.निबंध स्पर्धा – विजेते

**तालुकास्तरीय आंतरशालेय निबंध स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे**

प्रथम : चिंचोलकर प्रतीक्षा शरद, नूतन कन्या प्रशाला

द्वितीय : उगले श्रुती सुरेश, विवेकानंद प्राथमिक शाळा,

तृतीय : कटारे शिवकन्या जगन्नाथ, के.जी.बी.व्ही. सेलू,

विजेत्या विद्यार्थ्यांना तसेच सहभागी स्पर्धक यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषिके व रोख बक्षीस प्रदान करण्यात आली.

सेलू नगर परिषद निवडणुकीत नगरसेवक म्हणून विजयी झाल्याबद्दल डॉ .अनिकेत जोगदंड यांचा सर्व मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सहृदय सत्कार करण्यात आला.याच कार्यक्रमात संस्थेचे सहसचिव श्री. बाबासाहेब चारठाणकर यांची खादी ग्रामोद्योग, नांदेड येथे बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. मंगेश शेळके यांनी केले.कार्यक्रमाचे आभार श्री. भगवान पावडे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती विजयमाला काळे, श्री. कृष्णकांत खापरखुंटीकर, श्री. विष्णू कटारे, श्री. सुनील राठोड, श्री. बाळू धनवे, श्री. शेख खुर्शिदा, श्री. तुकाराम अंभोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शब्दांचा जादूगार रत्नाकर गाताडी सरांच्या स्मृतींना शैक्षणिक गुरुदक्षिणा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/ उरण रायगड :** “व्यक्तीचे अस्तित्व क्षणिक असते, मात्र त्या क्षणात केलेली सत्कर्मे अजरामर ठरतात,” हे वाक्य जणू शब्द सम्राट, शब्दांचा जादूगार स्वर्गीय रत्नाकर गाताडी सर यांच्या संपूर्ण जीवनकार्याचे सार सांगते. मरावे परी कीर्ती रूपे उरावे या ओळींचा खरा अर्थ लागू होणारे स्वर्गीय रत्नकर गाताडी.

उरण तालुक्यापुरतेच नव्हे, तर संपूर्ण पंचक्रोशीत आपल्या प्रभावी शब्दसामर्थ्याने, ओघवत्या निवेदनशैलीने आणि विचारप्रवर्तक वक्तृत्वाने श्रोत्यांची मने जिंकणारे, उत्तम निवेदक, प्रभावी वक्ते व आदर्श शिक्षक म्हणून ओळख असलेल्या स्वर्गीय रत्नाकर गाताडी सर यांचा १२ वा पुण्यस्मरण दिन दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी सुयश क्लासेस, आवरे यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कडापे येथे अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात स्वर्गीय रत्नाकर गाताडी सर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर श्रद्धांजलीपूर्वी आरती व मनःशांतीचे श्लोक म्हणण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी गाताडी सरांच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा गौरव करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.रत्नाकर गाताडी सर हे केवळ शब्दांचे जादूगार नव्हते, तर विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे प्रेरणास्थान होते. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालावा, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व वक्तृत्वगुण विकसित व्हावेत, या उद्देशाने स्वच्छता अभियानाअंतर्गत वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रा. जि. प. शाळा, कडापे येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत प्रभावी वक्तृत्व सादर केले. विशेषतः प्राप्ती म्हात्रे व आरोही थळी यांनी सादर केलेल्या वक्तृत्वाने उपस्थितांची विशेष दाद मिळवली.

कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना उत्तम पत्रकार, विद्यार्थीप्रिय शिक्षिका व कायद्याच्या अभ्यासिका रणिता ठाकूर मॅडम यांनी, “गुरूंचा आदर्श कसा घ्यावा, हे निवास गावंड सर यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. विद्यार्थ्यांनी कधीही नैतिक मूल्यांचा विसर पडू देऊ नये,” असे स्पष्ट मत व्यक्त केले.

स्वर्गीय रत्नाकर गाताडी सर हे कोप्रोली गावाचे खरे रत्न होते. त्यांनी आपल्या निवेदनकलेच्या







माध्यमातून कोप्रोली गावाचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवले, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. आपल्या गुरूला जाऊन तब्बल बारा वर्षे झाली असतानाही दरवर्षी त्यांच्या स्मृती जपणारे, वक्तृत्व स्पर्धांच्या माध्यमातून गुरुदक्षिणा अर्पण करणारे निवास गावंड सर हे आजच्या विद्यार्थ्यांसाठी आदर्श असल्याचे त्यांनी नमूद केले. रा. जि. प. शाळा, कडापे येथील मुख्याध्यापक श्री सर्वेश ठाकूर सर यांनी आपल्या मनोगतात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी एमपीएससी, यूपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करून यशाची दारे उघडावीत, असे आवाहन केले. हाच विचारस्वरूप वारसा स्वर्गीय रत्नाकर गाताडी सर यांचा असल्याचे त्यांनी सांगितले.

या पुण्यस्मरण दिनानिमित्त सुयश क्लासेस चे अध्यक्ष निवास गावंड सर यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य म्हणून शैक्षणिक पॅड व पट्टयांचे वाटप करण्यात आले.

तसेच उपस्थित मान्यवरांना नवीन वर्षाच्या स्वागतार्थ दिनदर्शिकांचे वितरण करण्यात आले.या कार्यक्रमास रा. जि. प. शाळेचे मुख्याध्यापक सर्वेश ठाकूर सर, रणिता ठाकूर मॅडम (पत्रकार व सामाजिक कार्यकर्ती), सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे सर, शंकर पाटील, हरीश म्हात्रे, व्यवस्थापन समिती सदस्य साक्षी थळी, पल्लवी थळी, नीलम थळी, आविष्कार म्हात्रे, सुप्रिया थळी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे सर यांनी केले. शब्द, विचार आणि शिक्षणाचा संगम साधणारा हा कार्यक्रम उपस्थितांच्या मनावर खोल ठसा उमटवणारा ठरला.

# भारतीय सीमेवर घुसखोरी करणाऱ्या पाकिस्तानच्या घुसखोराला ठोकल्या बेड्या

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली :**

नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीय सीमा ओलांडून घातपात घडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानच्या घुसखोराला सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी पकडलं. या घुसखोराला पकडून भारतीय सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी मोठा घातपाताचा प्रयत्न हाणून पाडला.

ही घटना नाचना सेक्टरमध्ये घडली असून ७२व्या बटालियनचे जवान नियमित गस्त घालत होते. यावेळी धुक्यात जवानांना हा घुसखोराला आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून भारतीय सीमेत घुसताना पाहिल्यानंतर त्याला पकडण्यात आलं. इशरत राणा मोहम्मद अस्लम असं त्या घुसखोराचं नाव आहे.

पाकिस्तानी घुसखोराला भारतीय सीमेकडं येताना पाहून सीमा सुरक्षा दलाचे सतर्क झाले. या जवानांनी तत्काळ परिसराला घेराव घातला. यावेळी घुसखोरानं काटेरी तार ओलांडून भारतीय सीमेत प्रवेश करताच त्याला जागीच ताब्यात घेण्यात आलं.

प्रजासत्ताक दिनापूर्वी झालेली ही घुसखोरी गंभीर बाब मानून, बीएसएफ आणि गुप्तचर संस्था त्याची कसून चौकशी करत आहेत. हा घुसखोर हेरगिरीच्या कारवायांमध्ये सहभागी असल्याची शक्यता सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना आहे.



या घुसखोराला ‘ऑपरेशन अलर्ट’ अंतर्गत अटक करण्यात आलं आहे. या घुसखोराला जवळच्या सीमा सुरक्षा दलाच्या चौकीत नेण्यात आलं. प्राथमिक चौकशीदरम्यान, त्यानं स्वतःची ओळख इशरत राणा मोहम्मद अस्लम (३५) अशी सांगितली आहे. तो पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील सरगोधा जिल्ह्यातील रहिवासी आहे, असंही त्यानं सांगितलं. चौकशीदरम्यान तो घाबरलेला आणि अस्वस्थ दिसून आल्यानं सीमा सुरक्षा दलाच्या जवानांचा त्याच्यावरील संशय बळावला आहे. बीएसएफच्या सूत्रांनुसार, “शोधमोहिमेदरम्यान त्याच्याकडून कोणतीही शस्त्रं, कागदपत्रं किंवा संशयास्पद वस्तू सापडल्या नाहीत. मात्र चौकशीदरम्यान त्यानं वारंवार आपला जबाब बदलला. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांच्या संशयाला आणखी बळकटी मिळाली. त्याची मानसिक स्थिती तपासण्यासाठी वैद्यकीय तपासणी देखील केली जात आहे.

सध्या, बीएसएफ आणि इतर सुरक्षा यंत्रणा संयुक्तपणे त्याची चौकशी करत आहेत. सर्व औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर त्याला नाचना पोलीस ठाण्यात सोपवलं जाईल.”

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले : मानवतेची तेजस्वी मशाल

**भारतीय समाजाचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतरांचा किंवा युद्धांच्या पराभव-विजयांचा इतिहास नाही, तर तो माणसाने माणसावर लादलेल्या अन्यायकारक सामाजिक रचनेचा आणि त्या रचनेविरुद्ध उभ्या राहिलेल्या मानवी संघर्षांचा दीर्घ इतिहास आहे. या इतिहासात अनेक राजे, योद्धे आणि विचारवंत आढळतात; मात्र ज्यांनी समाजाच्या मुळावरच प्रहार करून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला, अशी व्यक्तिमत्त्वे तुलनेने कमी आहेत. अशा दुर्मीळ, तेजस्वी आणि क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ३ जानेवारी १८३१ रोजी जन्मलेल्या सावित्रीबाई फुले या केवळ भारतातील पहिल्या महिला शिक्षिका नव्हत्या, तर त्या शिक्षण, समता, स्त्रीमुक्ती, दलितोद्धार आणि मानवमूल्यांच्या रक्षणासाठी आयुष्यभर झगडणाऱ्या महान समाजसुधारक होत्या. त्यांच्या जीवनाचा प्रत्येक क्षण हा अन्यायाविरुद्धचा संघर्ष आणि मानवतेच्या बाजूने उभा राहिलेला साक्षात्कार होता.**

सावित्रीबाई फुले ज्या सामाजिक वातावरणात जन्माला आल्या, ते वातावरण अत्यंत प्रतिगामी, विषम आणि अमानवी होते. जातिभेद हा समाजव्यवस्थेचा कणा मानला जात होता. जन्मावर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेचे नियम इतके कठोर होते की माणसाच्या आयुष्याची दिशा त्याच्या जन्मानेच ठरवली जात होती. अस्पृश्यतेच्या नावाखाली समाजातील मोठ्या वर्गाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच नाकारला गेला होता. स्त्री ही पुरुषाची मालमत्ता समजली जात होती. शिक्षण, स्वातंत्र्य, मतप्रदर्शन आणि निर्णयक्षमता या गोष्टी स्त्रीसाठी निषिद्ध मानल्या जात होत्या. बालविवाह, बहुपत्नीत्व, विधवांचे केशवपन, धार्मिक अंधश्रद्धा, सामाजिक बहिष्कार आणि मानसिक छळ या प्रथा समाजमान्य होत्या. अशा परिस्थितीत जन्म घेऊनही सावित्रीबाई फुले यांनी या व्यवस्थेला निमूटपणे स्वीकारले नाही, तर तिच्या विरोधात उभे राहण्याचे अपूर्व धैर्य दाखवले.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबतचा सावित्रीबाईंचा जीवनप्रवास हा केवळ पती-पत्नीचा सहवास नव्हता, तर तो विचारसमानतेवर आधारित सामाजिक संघर्षाचा सहप्रवास होता. ज्योतिराव फुले यांनी सावित्रीबाईंना शिक्षण दिले आणि समाजपरिवर्तनाची दृष्टी दिली. त्या काळात स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे समाजाच्या रूढींना उघड आव्हान देणे होते. शिक्षण घेतल्यानंतर सावित्रीबाईंनी हे स्पष्टपणे ओळखले की शिक्षणाशिवाय समाजातील शूद्र-अतिशूद्र, दलित आणि स्त्रिया कधीही मानसिक गुलामगिरीतून मुक्त होऊ शकणार नाहीत. शिक्षण हे केवळ अक्षरज्ञान नसून ते माणसाला विचारशील, विवेकी आणि स्वाभिमानी बनवते, हा विचार त्यांच्या संपूर्ण कार्याचा पाया ठरला.

१८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी सुरू झालेली पहिली शाळा ही भारतीय समाजाच्या इतिहासातील एक क्रांतिकारी घटना होती. ही शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नव्हती, तर ती पितृसत्ताक, जातीय आणि स्त्रीद्वेषी व्यवस्थेविरुद्ध उघड केलेले बंड होते. सावित्रीबाई दररोज शाळेत जात असताना त्यांना समाजाच्या तीव्र विरोधाला सामोरे जावे लागत असे. रस्त्यात त्यांच्या अंगावर शेण, चिखल, दगड फेकले जात. त्यांना अपमानास्पद शिव्या दिल्या जात. मात्र या सर्व अपमानांना सामोरे जात असतानाही त्यांनी शिक्षणाचा मार्ग कधीही सोडला नाही. त्यांच्या पिशवीतील अतिरिक्त साडी ही त्यांच्या चिकाटीचे, धैर्याचे आणि मानवतेवरील अढळ विश्वासाचे प्रतीक बनली.

सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणकार्य केवळ उच्चवर्णीय समाजापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी शूद्र-अतिशूद्र, दलित आणि वंचित समाजातील मुला-मुलींसाठी शाळा सुरू करून शिक्षणावर असलेली जातीय मक्तेदारी मोडून काढली. समाजाच्या तळागाळातील घटकांना शिक्षणाची संधी मिळणे हीच खरी सामाजिक क्रांती आहे, हा विचार त्यांनी कृतीतून सिद्ध केला. शिक्षणामुळे माणूस प्रश्न विचारायला शिकतो, अन्याय ओळखतो आणि स्वतःच्या हक्कांसाठी उभा राहतो, हे त्यांनी समाजासमोर ठामपणे मांडले.

स्त्रियांच्या सामाजिक स्थितीबाबत सावित्रीबाई फुले यांची भूमिका अत्यंत प्रगत, मानवतावादी आणि काळाच्या पुढची होती. त्या काळात स्त्रीला दुय्यम, दुर्बल आणि परावलंबी मानले जात असताना सावित्रीबाईंनी स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, विचारशक्ती आणि आत्मसन्मान असलेला मानव म्हणून पाहिले. स्त्रीशिक्षणाशिवाय




समाजाचा सर्वांगीण विकास शक्य नाही, हे त्यांनी आपल्या लेखनातून आणि कार्यातून समाजासमोर मांडले. शिक्षित स्त्री ही केवळ स्वतःचेच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचे आणि पुढील पिढ्यांचे भविष्य घडवते, हा विचार त्यांनी समाजमनात रुजवण्याचा प्रयत्न केला.

विधवांच्या प्रश्नांवर सावित्रीबाई फुले यांनी घेतलेली भूमिका त्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्या काळात विधवांचे जीवन अत्यंत अमानवी होते. केशवपन, रंगीत वस्त्रांवर बंदी, धार्मिक बंधने, सामाजिक बहिष्कार आणि मानसिक छळ या साऱ्या गोष्टी विधवांच्या नशिबी होत्या. सावित्रीबाईंनी या प्रथांचा तीव्र विरोध केला. त्यांनी विधवांसाठी आश्रयगृहे सुरू केली आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, यासाठी समाजाशी संघर्ष केला. विधवा म्हणजे पापी किंवा समाजावर ओझे नसून तीही एक पूर्ण मानव आहे, हा विचार त्यांनी समाजासमोर ठामपणे मांडला.

विधवांच्या आयुष्यातील सर्वात भीषण समस्या म्हणजे सामाजिक भीतीमुळे होणाऱ्या बालहत्या. अवैध गर्भधारणेमुळे अनेक विधवांना नवजात बालकांचा बळी द्यावा लागत असे. या अमानुष प्रथेविरुद्ध सावित्रीबाई फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. येथे विधवांना सुरक्षित वातावरणात प्रसूती करता येत असे. हा उपक्रम म्हणजे केवळ समाजसुधारणा नव्हे, तर तो मानवी करुणेचा आणि मातृत्वाच्या सन्मानाचा सर्वोच्च आविष्कार होता.

अस्पृश्यता निर्मूलनासाठी सावित्रीबाई फुले यांनी उचललेली पावले त्या काळात अत्यंत धाडसी आणि क्रांतिकारी होती. अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यांवर पाणी घेण्यास मनाई असताना त्यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला. ही कृती म्हणजे सामाजिक समतेचा आणि मानवतेचा जाहीरनामा होता. त्यांनी कृतीतून दाखवून दिले की माणसाची ओळख त्याच्या जातीवर नव्हे, तर त्याच्या माणूसपणावर आधारित असली पाहिजे.

सावित्रीबाई फुले या केवळ समाजसुधारक नव्हत्या, तर त्या एक संवेदनशील कवयित्री, लेखिका आणि विचारवंतही होत्या. त्यांच्या "काव्यफुले" या काव्यसंग्रहातून त्यांनी अज्ञानाविरुद्धचा आक्रोश, स्त्रीदुःख, सामाजिक विषमता आणि शिक्षणाचे महत्त्व प्रभावी शब्दांत मांडले. त्यांचे साहित्य हे सामाजिक क्रांतीचे शब्दरूप होते. त्यांच्या कवितांमधून समाजाला आत्मपरीक्षणाची प्रेरणा मिळाली.

१८९७ साली पुण्यात प्लेगची भीषण साथ पसरली असताना सावित्रीबाई फुले यांनी मानवतेचा सर्वोच्च आदर्श घालून दिला. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी रुग्णांची सेवा केली. एका आजारी मुलाला वाचवताना त्यांना प्लेगची लागण झाली आणि त्यातच त्यांचे निधन झाले. मानवतेसाठी जगणे आणि मानवतेसाठीच प्राण अर्पण करणे हे त्यांच्या जीवनाचे अंतिम सत्य ठरले.

आज सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करताना केवळ औपचारिक कार्यक्रम, भाषणे किंवा प्रतिमा पूजन पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचा, मूल्यांचा आणि सामाजिक कार्याचा आशय आत्मसात करून तो आजच्या समाजात प्रत्यक्ष कृतीत उतरवणे हीच खरी आदरांजली ठरेल. आजही स्त्रीशिक्षण, लिंगभेद, जातीय विषमता, सामाजिक अन्याय आणि आर्थिक असमानता या समस्या विविध स्वरूपात अस्तित्वात आहेत. अशा वेळी सावित्रीबाई फुले यांचे विचार अधिकच मार्गदर्शक ठरतात.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या केवळ इतिहासातील व्यक्ती नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणारी प्रेरणास्रोत आहेत. त्यांनी पेटवलेली शिक्षणाची, समतेची आणि मानवतेची मशाल आजही समाजाला प्रकाश दाखवत आहे. त्या मशालीचा प्रकाश समाजाच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचवणे, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी मानवंदना ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# ३ जानेवारी - सावित्रीबाई फुले जयंती; स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार - सावित्रीबाई फुले

पुरुषप्रधान समाज व्यवस्थेच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी फुले दांपत्याने जी क्रांतिकारक कामगिरी केली आहे,त्याचं शब्दात वर्णन करणं अवघड आहे.१५० वर्षांपूर्वी स्त्री- पुरुष समानता अन् सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी महात्मा फुले अन् सावित्रीबाई फुले यांनी संयुक्तरित्या तत्कालिन रूढीप्रिय अन् मनुवादी समाज व्यवस्थेविरुद्ध दंड थोपटले. त्याकाळी स्त्रियांना चूल अन् मूल या चौकटीत जीवन कंठावे लागायचे.मनुस्मृतीच्या आधारे उभारलेल्या वर्णव्यवस्थेत स्त्रीजातीला हिन अशी दुय्यम दर्जाची वागणूक दिला जाऊन त्यांना शारीरिक उपभोगाची वस्तू म्हणून अमानुष वागणूक दिली जात असे.तसेच स्त्रियांना शिक्षण घेण्यास पूर्णतः मज्जाव असायचा.परिणामस्वरूप स्त्रिया ह्या तत्कालिन समाजात सामाजिक गुलामगिरीच्या बेड्यांमध्ये जखडल्या गेल्या होत्या.जणू काही त्यांचा कोणी वालीच नव्हता.त्यांचे जीवन पूर्णतः असुरक्षित व निराधार झालं होतं. अशात फुले दाम्पत्याचा उदय झाला,अन् जणू काही स्त्री जातीचा पालनहार पृथ्वीतळावर प्रगट होऊन स्त्रियांना शिक्षणाची कवाडं उघडणारे देवदूत भारतभूमीवर अवतरले.स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांना जयंती दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली!

स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांना शिक्षित करून त्यांना स्वयंनिर्भर करणाऱ्या वंदनीय सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्याच्या खंडाळा तालुक्यातील नायगाव येथील खंडोजी नेवसे-पाटील यांच्या इमानदार घराण्यात झाला,अन् जणू काही स्त्री शिक्षणाची दिव्यज्योती प्रकाशित झाली. स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रवर्तक सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणाकरिता विद्येची ज्योत पेटविण्यासाठी पुढाकार घेऊन त्यांची पुरुषप्रधान समाजाच्या मगरमिठीतुन सुटका केली. दि.१ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील भिडेंच्या वाड्यात स्त्रीयांच्या शाळेची मुहूर्तमेढ करून स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्याची जणू ही नांदीच ठरली.

स्त्री शिक्षणाची बिजे रोवल्याने तथाकथित कर्मकांडी पंडितांचा राग अनावरण झाला.त्यांनी शाळेत येत जातांना सावित्रीबाई फुले यांच्यावर अमानुष अत्याचार केला.त्यांच्या अंगावर कधी शेणाचं पाणी तर,कधी दगडांचा वर्षाव केला.एके प्रसंगी तर सावित्रीबाईंचे दगड लागल्याने डोकंच फुटलं होतं. बऱ्याच वेळा असभ्य शब्दांनी सावित्रीबाईंना हिणवले जायायचे..एवढं घडूनही सावित्रीबाई ह्या आपल्या ध्येयापासून हटल्या नाहीत. त्यांनी न डगमगता आपली स्त्री शिक्षणाची मोहीम पुढे पूर्णक्षमतेने सुरूच ठेवली. वास्तविक पहाता,सावित्रीबाई फुले ह्या भारतातल्या पहिल्या शिक्षिका ठरल्या असून,त्यांनी सुरू केलेली भिडेंच्या वाड्यातील शाळा ही देशातील पहिली मुलींची शाळा म्हणून नावरूपाला आली.यास्तव सावित्रीबाई फुले यांना मराठी जनमानसाचा मानाचा मुजरा!

आज सावित्रीच्या लेकी शिकूनसवरून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून विविध क्षेत्रात आघाडी घेताहेत.ही खऱ्या अर्थाने फुले दाम्पत्याचीच पुण्याई म्हणावी.थोर समाजसेविका वंदनीय सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांच्या स्त्री शिक्षणातील महान कामगिरीला नतमस्तक होत,तत्कालीन राज्य सरकारने पुणे विद्यापीठाचे नामांतर करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे केले. वास्तविक पहाता,हीच खरी त्यांच्या महनीय कार्याची पावती होय.

शिक्षणाची महती-उपयुक्तता सांगताना सावित्रीबाई फुले म्हणतात,शिक्षणाने मनुष्यत्व येते.पशुत्व हरते पहा!विद्या हे धन आहे रे...श्रेष्ठ साऱ्या धनाहून,तिचा साठा जया पाशी,तो ज्ञानी मानिती जना! विद्या हे सर्वश्रेष्ठ धन असून,ज्याच्यापाशी हे धन आहे,तो समाजात ज्ञानी म्हटला जातो,असा उपदेश सावित्रीबाईंनी समाजातील स्त्रियांना दिला.

जिच्या हाती पाळण्याची दोरी,ती जगाते उद्धारी ही उक्ती फुले दांपत्याने स्त्रियांच्या दारी शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवून स्त्री स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले.महात्मा फुले यांच्या निधनानंतर स्त्रियांना समाजात न्याय मिळावा,या उद्देशाने स्रीशिक्षण,स्त्री मुक्ती,स्त्री-पुरुष समानता यावर सावित्रीबाईंनी अधिक भर देऊन ज्योतिबा फुले यांचे सामाजिक समतेचं कार्य पुढे अविरत चालूच ठेवले.

सावित्रीबाईंनी बाल विवाह,विधवा स्त्रियांचे केशवपन,बालहत्या करणं, हुंडापद्धती,जातीभेद,वर्णभेद या कुप्रथांना कडाडून विरोध केला,तर स्त्री शिक्षण,विधवा पुनर्विवाह यांना प्रोत्साहित केले.निरक्षरता अन् गरिबी ही सामाजिक व बौद्धिक गुलामगिरीची दोन मुख्य कारणे असल्यामुळे प्रत्येकाने शिक्षण घेण्यास पुढे यावे. शिकल्याने माणूस हुशार व विवेकी होऊन,त्याला चांगलं काय अन् वाईट काय,याची चांगल्याप्रकारे कल्पना येते.तसेच त्याला आपल्या हक्कांची जाणीव होते.या पार्श्वभूमीवर स्त्रियांनी शिक्षण घेण्यास स्वयंस्फूर्तीने पुढे यावे.अन् आपल्या कुटुंबाच्या व समाजाच्या सर्वांगीण विकासात आपलं योगदान द्यावं,म्हणजे हीच खरी सावित्रीबाईंना मानवंदना ठरेल.

**पत्रकार रणवीर राजपूत,ठाणे/नंदुरबार**
**निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी,महाराष्ट्र शासन**

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले: आधुनिक स्त्री शक्तीचा उगम

सावित्रीबाई फुले हे नाव घेताच संघर्ष, धैर्य आणि परिवर्तनाचा इतिहास डोळ्यासमोर उभा राहतो. महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेली ही थोर लेक भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका ठरली. स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या या महान समाजसुधारिकेने आपल्या कार्यातून आधुनिक भारतातील स्त्री जागृतीचा मार्ग प्रशस्त केला.


सावित्रीबाई फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतिराव फुले यांच्याशी झाला. विवाहानंतर जोतिरावांनी त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत अक्षरओळख करून दिली. सावित्रीबाईंनी केवळ स्वतःचे शिक्षण पूर्ण केले नाही, तर समाजातील शेवटच्या घटकातील मुलींपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचा ध्यास घेतला.

त्यांचे सामाजिक कार्य अत्यंत व्यापक स्वरूपाचे होते. 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन करून त्यांनी अनेक अनाथ व निराधार बालकांना जीवनदान दिले. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद आणि सामाजिक विषमतेविरुद्ध संघर्ष केला. 'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हे त्यांचे काव्यसंग्रह आजही समाजजागृतीचे प्रभावी साधन ठरतात.

सावित्रीबाईंनी सुरू केलेल्या शिक्षणामुळे जेव्हा पहिली पिढी सुशिक्षित झाली, तेव्हा खऱ्या अर्थाने स्त्री मुक्तीचा पाया रचला गेला. आज स्त्रिया विविध क्षेत्रांत जी प्रगती करत आहेत, त्या यशाच्या मुळाशी सावित्रीबाईंचा संघर्ष, त्याग आणि घाम दडलेला आहे.

अशा या थोर समाजसुधारिकेचा विचारवारसा पुढे नेणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले (१८३१–१८९७) या केवळ एक शिक्षिका नव्हत्या, तर त्या आधुनिक भारतातील स्त्री मुक्ती चळवळीच्या जननी आणि महान समाजसुधारक होत्या. ३ जानेवारी हा त्यांचा जन्मदिन भारतात 'बालिका दिन' म्हणून साजरा केला जातो.




**त्यांच्या जीवनातील काही महत्त्वाचे पैलू पुढीलप्रमाणे:**

१) स्त्री शिक्षणाची गंगोत्री

महात्मा जोतिराव फुले यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेत सावित्रीबाई फुले भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका बनल्या.

१ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडेवाडा येथे त्यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली. त्या काळात मुलींना शिकवणे पाप मानले जात असे. शाळेत जाताना लोक त्यांच्यावर शेण व दगड फेकत, तरीही त्या हार मानत नसत. त्या नेहमी एक जादा साडी सोबत ठेवत असत.

२) सामाजिक कार्य व सुधारणा

सावित्रीबाईंचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नव्हते.

बालविवाहाचा त्यांनी तीव्र निषेध केला आणि सती प्रथेविरुद्ध आवाज उठवला.

विधवांच्या पुनर्विवाहासाठी त्यांनी प्रयत्न केले तसेच विधवांचे केशवपन थांबवण्यासाठी नाभिकांचा संप घडवून आणला.

शोषित विधवांच्या मुलांच्या संगोपनासाठी त्यांनी स्वतःच्या घरात 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेच्या मुलाला (यशवंत) त्यांनी दत्तक घेतले.

३) सत्यशोधक समाज

महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजात सावित्रीबाईंचा सक्रिय सहभाग होता. जोतिरावांच्या निधनानंतर (१८९०) त्यांनी संस्थेची धुरा समर्थपणे सांभाळली आणि सत्यशोधक पद्धतीने अनेक विवाह लावून दिले.

४) साहित्यिक योगदान

सावित्रीबाई या एक संवेदनशील कवयित्री होत्या.

'काव्यफुले' (१८५४) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह असून

'बावनकशी सुबोध रत्नाकर' हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ आहे.

"विद्या मिळवा, शूद्रांना सांगण्यासारखे हेच आहे. शिक्षण घ्या आणि पिढ्यानपिढ्यांची गुलामगिरी तोडून टाका."
— सावित्रीबाई फुले

५) अंतिम काळ व समर्पण

१८९७ मध्ये पुण्यात प्लेगची भीषण साथ पसरली. रुग्णांची सेवा करत असताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली आणि १० मार्च १८९७ रोजी या महान माऊलीने जगाचा निरोप घेतला.

**निष्कर्ष**

आजच्या आधुनिक युगात स्त्रिया ज्या सन्मानाने शिक्षण घेत आहेत व विविध क्षेत्रांत प्रगती करत आहेत, त्याचे संपूर्ण श्रेय सावित्रीबाई फुले यांच्या धैर्य, त्याग आणि दूरदृष्टीला जाते.



**शेख अब्दुल रहीम**
**संस्थापक अध्यक्ष: हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन**
**सह-शिक्षक: चौधरी शेख मन्नाबी उर्दू प्राथमिक शाळा, छत्रपती संभाजीनगर**